रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक १४४ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)    www.krushival.in


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २२ ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹


## मुंबई-गोवा महामार्गावर भीषण अपघात

**पेण :** मुंबई-गोवा महामार्गावर रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील जिते गावाजवळ रविवारी (दि.२०) रात्री ८:३० च्या सुमारास एक गंभीर अपघात घडला. बुलेट मोटरसायकलवरून प्रवास करणारे वैभव वसंत चौहान आणि त्यांच्या पाठीमागे बसलेले दर्शन चंद्रकांत रहाटे हे पेणहुन पनवेलकडे जात असताना हा अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार, अज्ञात वाहनाने त्यांच्या बुलेटला मागून जोरदार ठोकर दिली. ज्यामुळे दर्शन रहाटे खाली पडले आणि त्यांच्या अंगावरून अज्ञात वाहनाची चहके गेली. या अपघातात दर्शन रहाटे यांचा घटनास्थळीच पान २ वर

## शेतकऱ्यांना दिलासा?

**पुणे :** राज्यातून नैऋत्य मॉन्सून परत गेला असला तरी देखील पाऊस पडत आहे, त्यामुळे पिकांचे नुकसान होत आहे. अजूनही किती दिवस पाऊस असा सवाल शेतकरी देखील विचारत आहेत. शेतकऱ्यांना पुढील आठवड्यात दिलासा मिळणार असून, हवामान कोरडे राहणार आहे. बंगालच्या उपसागरात २३ ऑक्टोबरनंतर 'दाना' चक्रीवादळ येणार आहे. सध्या ईशान्य मान्सून सक्रिय असल्याने आणि अरबी समुद्रातील बाष्प येत असल्याने महाराष्ट्रात पाऊस होत आहे. त्यामुळे अनेक भागात पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. नैऋत्य मान्सून आणि अरबी समुद्राकडून येणारे बाष्प या दोन्ही वाऱ्यांमुळे महाराष्ट्रात पाऊस पडत आहे. हवामानाची प्रणाली पश्चिम-वायव्य पान २ वर

# आज ठरणार शेकापचा उमेदवार

## शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या उपस्थितीत अलिबागमध्ये होणार सभा



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग विधानसभा मतदार संघातील निवडणुकीसाठी शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते सज्ज झाले आहे. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि.२२) सायंकाळी चार वाजता भव्य सभा आयोजित केली आहे. या सभेमध्ये आज शेकापचा उमेदवार ठरणार आहे.

अलिबाग विधानसभा मतदार संघ हा शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. शेकापच्या माध्यमातून केलेल्या विकासकामांमुळे शेतकरी कामगार पक्ष अलिबाग, मुरुड व रोहा मतदारसंघातील घराघरात पोहोचला आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगार व दुर्बल घटकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाने लढे दिले आहेत. विधानसभेसह विधान परिषदेच्या सभागृहात आवाज उठवून अन्यायग्रस्तांना न्याय दिला आहे. शेतकरी कामगार पक्षाची सत्ता आणण्यासाठी या मतदार संघातील कार्यकर्ते सज्ज झाले आहेत.

गेले अनेक दिवस शेकापचा उमेदवार कोण असणार, याकडे अनेकांचे लक्ष लागून राहिल होते. ही उत्कंठा आता संपणार आहे. शेकापचे नेते जयंत पाटील यांनी भव्य सभा अलिबागमध्ये घेण्याचे जाहीर केले आहे. त्यानुसार गेल्या अनेक दिवसांपासून कार्यकर्ते कामाला लागले आहेत. अलिबागमध्ये हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याची तयारीदेखील कार्यकर्त्यांनी केली आहे.

शेकाप भवनसमोर भव्य सभा शेकाप नेते जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यासभेत ते कार्यकर्त्यांना संबोधित करणार असून शेकापचा उमेदवारही जाहीर करणार आहेत, त्यामुळे कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहप तालुका चिटणीस अनिल पाटील यांनी केले आहे.

# 'जलजीवन' वादाच्या भोवऱ्यात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**स्थानिकांना विश्वासात न घेता नवेदर बेली येथील जलजीवन मिशनचे काम केले जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र राऊत यांनी केला आहे. याबाबत प्रशासनाकडे तक्रार केली. परंतु ठोस कारवाई करण्यास प्रशासन उदासीन ठरल्याने पुन्हा हा प्रकार सुरु असल्याने संतप्त झालेल्या राऊत यांनी अखेर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस महासंचालकांकडे या कामाबाबत लेखी तक्रार केली आहे. त्यामुळे जलजीवनचे काम वादाच्या भोवऱ्यात सापडले असून शिंदे गटातील सरपंच अडचणीत सापडण्याची शक्यता आहे. या प्रकरणाची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशीदेखील होणार असल्याचे चित्र आहे.**




अलिबाग तालुक्यातील ढवर ग्रामपंचायत हद्दीतील नवेदर बेली येथील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा व्हावा, यासाठी जिल्हा परिषदेमार्फत जलजीवन मिशन योजना राबिण्यात आली. लाखो रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. नवेदर बेलीमध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत गेल्या दीड वर्षापुर्वी घरोघरी नळ पाणी पुरवठा योजनेचे काम सुरु करण्यात आले. पाईपलाईन टाकण्यापासून पाण्याची टाकी उभारणीपर्यंतची कामे केली जात आहेत.

मात्र ही कामे निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप नरेंद्र राऊत यांच्यासह ग्रामस्थांकडून करण्यात आला होता. नवेदरबेली, ढवरपाडा नळपाणी पुरवठा योजनेअंतर्गत होत असलेल्या या कामाबाबत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांच्याकडे तक्रार करण्यात आली होती. या योजनेसाठी बसविण्यात येणारे पाईप काही ठिकाणी जूनेच वापरले जात आहेत. खोदकाम निकृष्ट दर्जाचे होत आहे. ही बाब निवेदनाद्वारे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली.

त्यामुळे काम बंद करण्यात आले होते. मात्र पुन्हा १४ ऑक्टोबरपासून ग्रामस्थांना कोणतीही माहिती न देता, तसेच त्यांना विश्वासात न घेता पूर्वीप्रमाणेच काम सुरु असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे.

> जलजीवनच्या कामाबाबत सर्वसाधारण सभा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. परंतु याबाबत ग्रामस्थांचे कोणत्याही प्रकारचे मत न घेता अधिकाऱ्यांनी मनमानी कारभार केला. तसेच टाकी कुठेही बांधू तुम्हाला काही करायचे ते करा, असे ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी वेंगुर्लेकर यांनी सांगितले. – नरेंद्र राऊत, सामाजिक कार्यकर्ता

> नवेदर बेली येथील जलजीवन मिशनच्या कामाबाबत आलेल्या तक्रारीची दखल घेत उपअभियंता यांच्याकडून चौकशी अहवाल मागविण्यात आला आहे. कामाची स्थिती सर्व माहिती घेऊन तो अहवाल कार्यालयात सादर करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.
> – संजय वेंगुर्लेकर, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, रायगड जिल्हा परिषद

तसेच इतरही अनेक शासकीय कामे ग्रामपंचायत हद्दीत करण्यात आली आहेत. ही सर्वच कामे निकृष्ट दर्जाची असून त्यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

यामध्ये ग्रामपंचायत ढवरच्या ग्रामसेवक सुप्रिया नाईक, ग्रामपंचायतीचे सरपंच विश्वनाथ गावंड, मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा अधिकारी वेंगुलकर, तसेच उपअभियंता यांचा सहभाग असून या कामात सर्वांनी भ्रष्टाचार केला आहे. त्यामुळे त्यांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी राऊत यांनी निवेदनाद्वारे केली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस महासंचालकांकडे ही तक्रार केली आहे. त्यामुळे जलजीवनची योजना वादाच्या भोवऱ्यात सापडत असताना संबंधित अधिकारी देखील अडचणीत सापडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

जलजीवन मिशनच्या कामाबाबत होणाऱ्या भ्रष्टाचाराची तक्रार केल्याबाबत विचारणा करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी यांच्याशी संपर्क साधला, परंतु त्यांनी मोबाईलवर माहिती देणे टाळले. परंतु जे काही होईल त्याबाबत प्रेसनोट दिली जाईल, असे ते म्हणाले.

# आ. गोगावले पराभूत होणार

## स्नेहल जगताप यांचा विश्वास

**। महाड । प्रतिनिधी ।**



महाड विधानसभा मतदारसंघातून आ. भरत गोगावले यांना पराभूत करत स्नेहल माणिकराव जगताप आमदार होणार असल्याचा विश्वास व्यक्त करत राज्याचे माजी मुख्यमंत्री व पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पहिल्या यादीत उमेदवारी जाहीर करून दिलेला शब्द पूर्ण केला. हा महिलांचा सन्मान केला आहे, असे उद्गार स्नेहल जगताप यांनी घाटकोपर येथील संवाद मेळाव्याप्रसंगी काढले.

रविवारी सायंकाळी घाटकोपर येथे महाड विधानसभा मतदार संघातील कार्यक्रमाचा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी माजी मंत्री सुभाष देसाई, आ. सचिन अहिर, कोकण समन्वयक विजय कदम, भाऊ कोरगावकर, शरद पवार गटाच्या मुंबई अध्यक्षा राखी जाधव, शिवसेना प्रवक्ते अनिश गाढवे, दक्षिण रायगड संपर्क प्रमुख नागेंद्र राठोड, बाळकृष्ण राऊळ, दक्षिण रायगड महिला संघटिका डॉ. स्वीटी गिरासे, आरोग्य मदत कक्ष मुंबई प्रमुख कृष्णा कदम, महाड विधानसभा नेते नानासाहेब जगताप, जिल्हा प्रवक्ते धनंजय देशमुख, युवा सेना समन्व्यक महाराष्ट्र विनीत लाड, उपजिल्हा प्रमुख पद्माकर मोरे, महाड विधानसभा संपर्क प्रमुख अमित मोरे, माणगाव तालुका संपर्क प्रमुख पान २ वर

## हरिहरेश्वर येथील हल्लेखोर पर्यटकांना पोलीस कोठडी

**। हरिहरेश्वर । प्रतिनिधी ।**

हरिहरेश्वर येथे रविवारी पहाटे घडलेल्या गुन्ह्यातील आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून न्यायालयाने त्यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

हॉटेल रुममधील भाड्याच्या रकमेवरून झालेल्या वादातून ज्योती धामणस्कर महिलेला पर्यटकांनी अंगावर गाडी घालून चिरडून मारल्याची घटना हरिहरेश्वर येथे घडली होती. या गुन्ह्यातील तीन हल्लेखोर पर्यटकांना श्रीवर्धन न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. तर अन्य सात आरोपी अद्यापही फरार आहेत.

ज्योती धामणस्कर या महिलेची पिंपरी चिंचवड येथून आलेल्या पर्यटकांनी गाडीखाली चिरडून हत्या केली होती. या प्रकरणी पोलिसांनी इरप्पा यमनप्पा धोत्रे, आकाश गोविंद गावडे, विकी प्रेमसिंग गिल या तिघांना रविवारी सायंकाळी अटक केली होती. या तिघांना आज श्रीवर्धन येथील न्यायालयासमोर हजर करण्यात आले. तेव्हा न्यायालयाने तिघांनाही २४ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या घटनेतील अन्य आरोपींचा शोध सुरू आहे. फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी दोन पथके तयार करण्यात आली असून त्यांचा शोध सरू आहे.

## गडचिरोलीत पाच नक्षल्यांना कंठस्नान

**गडचिरोली :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नक्षल्यांचा घातपाताचा डाव उधळून लावण्यात गडचिरोली पोलिसांना सोमवारी (दि.२१) यश आले. छत्तीसगड सीमेवरील कोपर्शी जंगलात नक्षलवादी व जवानांत झालेल्या जोरदार चकमकीत पाच नक्षल्यांना पोलिसांनी कंठस्नान घातले. चकमकीत एक जवान जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत. छत्तीसगड सीमेवरील भामरागड तालुक्यातील कोपर्शी जंगलात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये २१ ऑक्टोबरला पहाटे चकमक सुरु झाली. पान २ वर

## मुंबई गोवा महामार्गावर टँकरने घेतला पेट

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावर रविवारी (ता.२०) रात्री माणगाव तालुक्यातील घोटवळ गावाजवळ ज्वलनशील रसायन भरलेल्या टँकरने अचानक पेट घेतला. मात्र चालकाच्या प्रसंगावधानतेमुळे व स्थानिक बचाव पथक आणि अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे ही आग आटोक्यात आणल्याने मोठी दुर्घटना टळली. यावेळी मार्गावरील वाहतूक काहीवेळ थांबविण्यात आली होती.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गुजरातमधील अदानी हाझिरा पोर्ट लिमिटेड कंपनीच्या एसीएन लिक्विड भरलेला टँकर मुंबई-गोवा महामार्गवरून चिपळूण येथील लोटे परशुराम एमआयडीसीत जात होता. यावेळी रात्री साडेसात ते पान २ वर

# महायुतीबाबत फेरविचार करणार

- रिपब्लिकन पक्षाच्या नेत्याचा गौप्यस्फोट
- पत्रकार परिषदेत केला जिल्हाध्यक्षांनी निषेध!

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

रायगड रिपब्लिकन पक्षाच्या (आठवले गट) कार्यकर्त्यांच्या मागण्या महायुती मान्य करत नसेल तर महायुतीत राहण्याबाबत फेरविचार करावा लागेल, असा इशारा रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांनी खोपोली येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिला. याचवेळी त्यांनी बोलताना विधानसभा निवडणुकीत कर्जत व पेण हे दोन तालुके रिपब्लिकन पक्षाला महायुतीतर्फे सोडण्यात यावे, अशीही मागणी केली.



**रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्याशी सातत्याने संपर्क करीत असतानाही, गेल्या अडीच वर्षात आम्हाला त्यांनी वेळही दिला नाही. तसेच आमच्याशी बोलणंही टाळले त्यामुळे अशा पालकमंत्र्यांचा आम्ही निषेध करतो, असे सांगून नरेंद्र गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत रिपब्लिकन पक्षाची उघडपणे नाराजी व्यक्त केली. यामुळे महायुतीत सारे काही आलबेल आहे असे दिसून येत नाही. पक्षाच्या या इशाऱ्याकडे महायुतीतील वरिष्ठ नेते कसे पाहतात हे पाहावे लागेल. ऐन निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांनी दिलेल्या इशारामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या पत्रकार परिषदेला जिल्हाभरातील वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.**

महायुतीतील घटक पक्ष शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट, व भारतीय जनता पक्ष या तिन्ही पान २ वर

## प्रवेशद्वार न उघडल्यामुळे संताप

**। नागपूर । प्रतिनिधी ।**

कंपनीचे प्रवेशद्वार न उघडल्याच्या संतापातून एका कर्मचाऱ्याने तेथील सुरक्षारक्षकाची लोखंडी रॉडने मारहाण करत हत्या केली. या प्रकरणात कंपनीच्या मालकांनी गुन्हा लपविण्याचा प्रयत्न करत पोलिसांची दिशाभूल केली होती. अगोदर अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र चौकशीनंतर सुरक्षारक्षकाची हत्या झाल्याची बाब समोर आली. एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. एमआयडीसीमध्ये उज्वल ईस्पात प्रायव्हेट कंपनी आहे. तेथे ८ ऑक्टोबर रोजी कमलेश रामसुजन पटेल (५०) यांचा मृत्यू झाला होता. त्यांना मेडिकलमध्ये पान २ वर

## जालना, रत्नागिरी, बारामती, धाराशीव, अमरावती व नाशिकमधील रुग्णांना दिलासा

# रायगडकरांच्या नशिबी प्रतीक्षाच

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

कर्करोग रुग्णांना अधिकाधिक चांगले आणि त्यांच्याच परिसरात उपचार मिळावेत, यासाठी राज्यातील सहा जिल्हा रुग्णालयांमध्ये कर्करोगावरील उपचार सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र यामध्ये रायगड जिल्ह्याचा समावेश नसल्याने रायगडकरांनी नाराजी व्यक्त केली आहे.

सरकारच्या निर्णयानुसार, चार जिल्हा रुग्णालयांमध्ये रेडिएशन ऑनकॉलॉजी केंद्र तर दोन जिल्ह्यांमधील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयामध्ये रेडियोथेरेपी आणि डे केअर किमोथेरेपी केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून उभारण्यात येणाऱ्या या केंद्रांमुळे सहा जिल्ह्यातील रुग्णांना त्यांच्या घराजवळ उपचार मिळू शकतील. त्यामुळे मुंबई, पुणे यांसारख्या शहरातील रुग्णालयांवर पडणारा ताण कमी होण्यास मदत होईल.





नागरिकांना घराजवळ कर्करोगावरील उपचार सुविधा मिळावी, यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग प्रयत्नशील आहे. त्यादृष्टीकोनातून राज्यातील जिल्हा रुग्णालयांमध्ये कर्करोगावरील उपचार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. जिल्हा रुग्णालये कर्करोगावर उपचार करण्यास सक्षम झाल्यास रुग्णांना मुंबई, पुणे यांसारख्या शहरात उपचारासाठी जाण्याची गरज पडणार नाही. त्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील चार जिल्हा रुग्णालयांमध्ये रेडिएशन ऑनकॉलॉजी केंद्र तर दोन जिल्ह्यांमध्ये रेडियोथेरेपी आणि डे केअर किमोथेरेपी केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. रेडिएशन ऑनकॉलॉजी केंद्र हे जालना, रत्नागिरी, बारामती व धाराशीव येथील जिल्हा रुग्णालयांमध्ये सुरू करण्यात येणार आहे, तर अमरावती व नाशिक येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयामध्ये रेडियोथेरेपी आणि डे केअर किमोथेरेपी केंद्र उभारण्यात येणार आहे. रेडिएशन ऑनकॉलॉजी केंद्र, रेडियोथेरेपी आणि डे केअर किमोथेरेपी केंद्र उभारण्यात येईल.

जालना, रत्नागिरी, बारामती व धाराशीव पान २ वर



# सरकारी, अनुदानित शाळांना बळ



। रायगड । प्रतिनिधी ।

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या तिसरी ते बारावीपर्यंतच्या राज्य अभ्यासक्रम आराखड्याला सुकाणू समितीने नुकतीच मान्यता दिली. या आराखड्यामुळे पटसंख्येत होणाऱ्या गळतीमुळे संकटात सापडलेल्या सरकारी, अनुदानित शाळांना बळ मिळेल, असे मत शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

शालेय शिक्षण विभागाने राज्यातील शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक प्रतिनिधी यांची मते विचारात घेत सरकारी, अनुदानित आणि इतर सर्व माध्यमांच्या शाळांमध्येही बारावीपर्यंत मराठी तर दहावीपर्यंत इंग्रजीचा विषय अनिवार्य केला आहे. या आराखड्याला सुकाणू समितीच्या मान्यतेमुळे सीबीएसईच्या धरतीवर विज्ञान, गणित, इंग्रजी आणि हिंदीसह व्यावसायिक विषयांसाठीचा पॅटर्न राज्यातील सरकारी, अनुदानित शाळांमध्ये राबवला जाणार आहे. या निर्णयामुळे संकटात सापडलेल्या सरकारी, अनुदानित शाळांना मोठा लाभ होईल, असा दावा तज्ज्ञांनी केला आहे.

आराखड्यातील मुख्य उद्दिष्ट

शाळांमधील मुले राष्ट्रीय स्तरावरील विविध प्रकारच्या परीक्षांच्या स्पर्धेत उतरतील. पहिलीपासून हिंदीचा समावेश केल्यास कोणतीही अडचण होणार नाही, असा दावा केला जात आहे. इंग्रजी आणि मराठी माध्यमांतील शाळांमध्ये दोन भाषांमध्ये अध्ययन झाल्याने विद्यार्थ्यांना अधिकची भाषा शिकता यावी म्हणून हिंदी भाषाही अनिवार्य केली आहे; पण एकीकडे मराठी भाषा अनिवार्य करून हिंदी आणि इंग्रजीला वैकल्पिक करण्याची मागणी काही तज्ज्ञांकडून होत आहे; तर दुसरीकडे विद्यार्थ्यांना किमान तीन भाषा शिकण्यासाठी सक्षम करणे, हे आराखड्याचे ध्येय आहे.

सीबीएसईच्या पॅटर्ननुसार आराखड्याची अंमलबजावणी करताना विज्ञान, गणित शिकवण्यासाठी पूर्णवेळ आणि तज्ज्ञ शिक्षकांची गरज आहे. प्रयोगशाळा अपडेट करण्याची गरज आहे. सरकारी, अनुदानित शाळांमध्ये संगणक सुविधांच्या देखभालीचा खर्च मिळत नाही. यासाठी सरकारने अधिकच्या निधीची तरतूद करणे गरजेचे आहे, असे प्रा. शरद जावडेकर यांनी सांगितले.

> “त्रिभाषा सूत्राचा खरा अर्थ प्रथम राज्यभाषेनंतर हिंदी व त्यानंतर इंग्रजी असा आहे. भाषिक राज्यात राज्यभाषेशिवाय अन्य कोणतीही भाषा सक्तीची असणे, हे अपेक्षित नाही. त्या ऐच्छिकच असायला हव्यात. हिंदीची सक्ती महाराष्ट्रात भाषिक राजकारणाची बीज पेरणी ठरेल.– श्रीपाद भालचंद्र जोशी, ज्येष्ठ साहित्यिक”

## २०० लिटर डिझेलची चोरी

**नवीन पनवेल :** दुधाच्या टँकर मधून २०० लिटर डिझेलची चोरी केल्याप्रकरणी चोरा विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शिवाजी जाधव हे टँकर क्रमांक एम एच १३ सीओ ६१८९ वर चालक म्हणून नोकरी करतात. त्यांनी इस्लामपूर एमआयडीसी राजाराम पाटील दूध सहकारी संघटना येथून दूध भरले व तेथील डिझेल पंपावर ३०० लिटर डिझेल देखील भरले. जवाहर इंडस्ट्री येथे दूध खाली करण्यासाठी ते निघाले. पहाटे तीन वाजता सुविधा कोल्ड स्टोरेज जवाहर इंडस्ट्री, कामोठे येथे पोहोचले. पहाट झाल्यामुळे ते झोपी गेले. त्यांना सकाळी जाग आली असता डिझेलच्या टाकीचे लॉक तुटलेले दिसले. अंदाजे २०० लिटर डिझेल चोरट्यांनी चोरून नेले.

## शेकापच्या पारंपरिक जागा द्या, अन्यथा महाविकास आघाडीतून बाहेर पडू

- मोहन गुंड यांचा इशारा
- बीड येथे महत्त्वपूर्ण बैठक संपन्न
- पक्षाने आदेश दिल्यास सहा जागेवर लढणार - विष्णुपंत घोलप

। बीड । प्रतिनिधी ।

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेकापक्षाच्या बीड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीमध्ये राजकीय घडामोडींची चर्चा करण्यात आली.

लोकसभा निवडणुकीमध्ये शेकापक्षासह डाव्या पक्षाच्या कुठल्याही नेत्यांनी लोकसभेसाठी हट्ट न धरता जातीवादी सरकार पडले पाहिजे, या भावनेतून महाविकास आघाडीला निस्वार्थपणे मदत केली. मात्र विधानसभेच्या वेळी जागा वाटपामध्ये शेकापच्या पारंपारिक मतदारसंघांमध्ये शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस जागा देण्यास मोठेपणा दाखवत नाहीत, जाणीवपूर्वक कोंडी केली जात असल्याची चर्चा या बैठकीत करण्यात आली. आपल्याला पारंपरिक जागा मिळत नसतील तर बीड जिल्ह्यामध्ये सहा जागांवर उमेदवार देऊ असा ठरवा मांडण्यात आला. राज्यभर निवडून येण्याची संख्या जरी ठराविक असली तरी महाविकास आघाडीला विजयाची लागणारी मत मात्र शेतकरी कामगार पक्षाकडे आहेत. हे महाविकास आघाडीच्या लोकांनी विसरू नये अन्यथा आघाडीतून बाहेर पडून बीडसह मराठवाड्यातल्या जागा लढू, असा इशारा मोहन गुंड यांनी दिला. यावेळी विष्णुपंत घोलप, आभी लोंढे, बाळासाहेब घुमरे, ॲड. नारायण गोले पाटील, ॲड.राजेंद्र नवले, इम्रान शेख, अशोक रोडे, शिवाजी सुरवसे, मुंजा पांचाळ आदी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## रस्त्यात टेम्पो पार्किंग जीवावर बेतले
# अपघातात एक ठार; दोन जखमी

। पनवेल । प्रतिनिधी ।

जलद गती मार्गावर वाहन पार्क करणे नियमबाह्य असतानाही शीव पनवेल मार्गावर अनेक ठिकाणी जड अवजड वाहने पार्क केली जातात. अशाच एका बेकायदा पार्क केलेल्या टेम्पोचा अंदाज न आल्याने टेम्पोला एक कार धडकली. या अपघातात मुंबईत कस्टम मध्ये अधीक्षक पदावर कार्यरत अधिकाऱ्याचा मृत्यू झाला असून दोघे जखमी झाले आहे. या प्रकरणी टेम्पो चालकाला ताब्यात घेतले आहे.

घनशाम वर्मा असे आरोपीचे नाव आहे. रविवारी सकाळी शीव पनवेल मार्गावर पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर जुईनगर रेल्वे पादचारी पुलाखाली रस्त्याच्या दुसऱ्या मार्गिकेवर वर्मा याने त्याचा टेम्पो पार्क केला होता. विशेष म्हणजे त्याने पार्किंग लाईट लावलेले नव्हते. सकाळी साडे अकरा बाराच्या सुमारास वाशी कडून सीबीडीच्या दिशेने याच मार्गावरून एका कारमधून कस्टम अधीक्षक नरेंद्र राय आणि त्यांचे सहकारी गौरव सिन्हा, अभिनव सिन्हा आणि दीपक गुप्ता हे जात होते. जलद मार्ग असल्याने गाड्यांचा वेग बऱ्यापैकी जास्त होता. त्यात जुईनगर येथे उभा असलेल्या टेम्पोचा अंदाज टेम्पोचा पार्किंग लाईट सुरु नसल्याने गाडी चालवणारे अभिनव यांना आला नाही.

त्यामुळे या टेम्पोला गाडी मागून धडकली. त्यात हे चौघेही जखमी झाले. नरेंद्र यांच्या डोळ्याला आणि डोक्याला जबर मार लागला. चौघांनाही अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे नरेंद्र यांचा मृत्यू झाल्याचे निदान डॉक्टरांनी केले. अन्य जखमींवर उपचार सुरु आहेत. अपघात घडल्यावर कार अचानक धडकल्याने मागून येणाऱ्या दुचाकी स्वाराचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि त्याची दुचाकी कारला धडकली. त्यात दुचाकीचे नुकसान झाले तर दुचाकी स्वार किरकोळ जखमी झाला. या प्रकरणी नेरुळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बेकायदा गाडी पार्क केल्याने झालेल्या अपघातात एकाच्या मृत्यूस कारण ठरला म्हणून टेम्पो चालक घनश्याम याला ताब्यात घेतले असून त्याच्यावर अटकेची कारवाई केली जाणार आहे, अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक तुकाराम कोरडे यांनी दिली.

## एक वर्षाच्या मुलीसह आई बेपत्ता

**पनवेल :** एक वर्षाच्या मुलीसह आई बेपत्ता झाल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पालेबुद्रुक येथे राहणाऱ्या सविता मंगेश मासवे व त्यांची एक वर्षाची मुलगी रेवांशी या दोघी राहत्या घरात आढळून आल्या नसल्याने त्या हरविल्या असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असून सविता यांची उंची ५ फुट, रंग सावळा, चेहरा गोल, केस काळे लांब, नाक सरळ, बांधा मध्यम, डोळे काळे असून अंगात पंजाबी ड्रेस, पायात चप्पल, गळ्यात सोन्यासारखे मंगळसूत्र आहे. तिला अनेक भाषा अवगत आहे. सोबत मोबाईल फोन आहे. त्याचप्रमाणे एक वर्षाची मुलगी सोबत आहे.

# दिंडोरीमार्फत सक्षमीकरण अभियान शिबीर

। पेण । प्रतिनिधी ।



पेण रामेश्वर मंदीर येथे श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास मार्ग दिंडोरी तसेच अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरू पिठ श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर यांच्या माध्यमातून ग्राम व नागरीविकास सक्षमीकरण अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

या अभियानासाठी श्री स्वामी समर्थ मठाच्या २० अनुयानांनी पेणमध्ये वेगवेगळया विषयांवरील पेण येथील नागरिकांच्या प्रश्नांचे निराकार केले. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना रंगनाथ पोटे, मोहन जाधव आणि तुषार शेडगे यांनी ग्राम व नागरीविकास सक्षमीकरण अभियानाबाबत माहिती देताना सांगितले की, आमच्या श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग दिंडोरी मार्फत २० टक्के आध्यात्मिक व ८० टक्के सामाजिक कामे १९५० पासून सुरू करण्यात आलेली आहेत. यामध्ये वेगवेगळे १८ विभाग आहेत.

या वेगवेगळया १८ विभागामध्ये आमचे अनुयायी काम करत असतात. यातील महत्त्वाचा विभाग म्हणजे बालसंस्कार विभाग ५ ते २५ वयोगटातील व्यक्तींना यामध्ये मार्गदर्शन केले जाते. जवळपास ७ हजार केंद्र यावर कार्य करत आहेत. त्यानंतर युवक संस्कार वर्ग यामध्ये युवकांवर शिक्षणापासून ते नोकरीपर्यंत, नोकरी पासून वैवाहिक जीवनापर्यंत मार्गदर्शन केले जाते. त्याच बरोबर स्वयंरोजगार यावर देखील मोठया प्रमाणात मार्गदर्शन केले जात आहे.

जगातील सर्वात मोठ्या अध्यात्मिक हॉस्पिटलचे त्र्यंबकेश्वर येथे काम सुरू आहे. भविष्यात या हॉस्पिटलचा फायदा सर्वसामान्य नागरिकांना होणार आहे. कारण आजच्या घडीला वैद्यकीय सेवा सर्वांनाच परवडत नाही. म्हणून हे अध्यात्मिक हॉस्पिटल सुरू करण्याचा हेतू आहे. जवळपास १८ कोटी अनुयायी आहेत. त्यांच्या सहकार्यातून या हॉस्पिटलची निर्मिती केली जात आहे. आम्ही २० जण पेण येथे आलो आहोत आणि येथे प्रतिसाद ही चांगला मिळाला आहे. त्यामुळे भविष्यात पेणमध्ये असे सक्षमीकरण शिबीर घेण्यात येणार आहेत.

पान १ वरून

## आ.गोगावले पराभूत होणार

सीताराम मेस्त्री, जिल्हा युवासेना अधिकारी चेतन पोटफोडे, जिल्हा वाहतूक सेना प्रमुख सुभाष मोरे, सह संपर्क प्रमुख महाड विधानसभा चंद्रकांत धोंडगे, महाड तालूका संपर्क प्रमुख रघुवीर देशमुख, जिल्हा सह समन्व्यक सोमनाथ ओझर्डे, तालुका प्रमुख आशिष फळसकर, गजानन अधिकारी, अनिल मालुसरे, निलेश सुतार, युवासेना अधिकारी प्रफुल धोंडगे, रणजित मालोरे, यांसह आजी-माजी शिवसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना स्नेहल जगताप यांनी महाडच्या नगरपालिकेमध्ये नगराध्यक्ष म्हणून काम करताना पाच वर्षात केलेल्या कामाचा आढावा घेत स्वर्गीय माणिकराव जगताप यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करणार असल्याचे सांगितले. तसेच गेल्या पंधरा वर्षात महाड तसेच पोलादपूरचा सर्वांगीण विकास झाला नसल्याची खंत व्यक्त करत तालुक्यातील प्रलंबित धरण, शिक्षण संस्था, आरोग्य व्यवस्था बळकट करणार असल्याची ग्वाही देत महिलांसाठी विविध योजना राबवणार असल्याचे सांगितले. यावेळी कार्यकर्त्यांनी स्वर्गीय माणिकराव जगताप यांच्या घोषणा दिल्या असता स्नेहल जगताप भावनिक झाल्याचे पहावयास मिळाले.

## गडचिरोलीत पाच नक्षल्यांना कंठस्नान

नक्षलविरोधी अभियान राबवित असताना नक्षलवाद्यांनी जवानांच्या दिशेने गोळीबार केला. यावेळी जवानांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. यात पाच नक्षल्यांचा खात्मा करण्यात जवानांना यश आले. दोन वेगवेगळ्या ठिकाणी ही चकमक झाली. यावेळी एक जवानही जखमी झाला आहे. जखमी जवानाला हेलिकॉप्टरने गडचिरोलीत आणले. त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, मृत पाच नक्षलवाद्यांचे मृतदेह देखील गडचिरोली येथे आणले आहेत. त्यांची ओळख पटविण्याचे काम उशिरापर्यंत सुरु होते.

कोपर्शी जंगलात पहाटे सहा वाजेपासून जवान व नक्षल्यांत चकमक सुरु झाली. दुपारी ४ वाजेपर्यंत ही चकमक सुरुच होती. त्यानंतर पोलिसांनी शोधमोहीम सुरु केली आहे. परिसरात झडती घेतल्यानंतर आतापर्यंत पाच नक्षल्यांचे मृतदेह आढळून आले आहेत. यात मृत नक्षल्यांची संख्या वाढू शकते, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

या घटनेनंतर पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी अपर अधीक्षक यतीश देशमुख, एम. रमेश यांच्या नेतृत्वात सी -६० पथकाच्या २२ तुकड्या व सीआरपीएफ च्या शीघ्रकृती दलाच्या दोन तुकड्या या कोपर्शी जंगलात पाठविण्यात आल्या. जंगलात दोन वेगवेगळ्या ठिकाणी माओवाद विरोधी अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.

## प्रवेशद्वार न उघडल्यामुळे संताप

खोट्या नावाने नेण्यात आले होते. चौकशीदरम्यान ही हत्या असल्याची बाब स्पष्ट झाली. ८ ऑक्टोबर रोजी रात्री साडेदहा वाजता कंपनीचे प्रवेशद्वार लवकर उघडले नाही, यावरून मनोहर उर्फ मनोज बबन बेंडे (४२, बाभुळगाव, यवतमाळ) याने पटेल यांची लोखंडी रॉडने प्रहार करत हत्या केली होती. त्यानेच सुरेश चंदानी व धर्मेश चंदानी यांच्या सांगण्यावरून मेडिकलमध्ये खोट्या नावाने नेले. १० ऑक्टोबर रोजी पटेल यांचा मृत्यू झाला होता. कंपनीतील सीसीटीव्ही कॅमेरे व डीव्हीआर मालकांनी काढून टाकला आणि बेंडेला पैसे देऊन कंपनीतून पळवून लावल्याची बाब समोर आली. पोलिसांनी तीनही आरोपींविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला व बेंडेला अटक केली आहे. कंपनीच्या मालकांना अद्यापही अटक झाली नसून पोलिसांवर कुणाचा दबाव येत आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

## रायगडकरांच्या नशिबी प्रतीक्षाच

येथे रेडिएशन ऑनकॉलॉजी केंद्र तसेच अमरावती व नाशिक येथे रेडियोथेरेपी आणि डे केअर किमोथेरेपी केंद्र, कर्करोगावरील उपचार आणि काळजी पुरविणारे केंद्र उभारण्याचे काम केंद्र सरकारचा अंगिकृत उपक्रम आणि केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग यांचा उपक्रम असलेले हॉस्पिटल सर्व्हिसेस कन्सलटन्सी कॉर्पोरेशन लिमिटेड (एचएससीसी लिमिटेड) या कंपनीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

हॉस्पिटल सर्व्हिसेस कन्सलटन्सी कॉर्पोरेशन लिमिटेड (एचएससीसी लिमिटेड) ही कंपनी या सहा जिल्ह्यांमधील कर्करोग उपचारावरील केंद्रांचे बांधकाम सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर पूर्ण करून देणार आहे. या केंद्रांमुळे सहा जिल्ह्यातील रुग्णांना त्यांच्या घराजवळ उपचाराची सुविधा मिळण्यास मदत होणार आहे. यामुळे मुंबई, पुणे यासारख्या शहरातील रुग्णालयांवर पडणारा ताण कमी होऊ शकेल.

## मुंबई गोवा महामार्गावर टँकरने घेतला पेट

आठच्या दरम्यान भुवन गावनजीक रस्ता दुभाजकाजवळ चालक रामदान याने वेग कमी करण्यासाठी ब्रेक दाबला. परंतु ब्रेक व क्लचमध्ये काहीतरी बिघाड झाल्याचं जाणवल्यामुळे चालकाने रस्त्याच्या बाजूला टँकर थांबवून पाहिले तेव्हा टँकरच्या मागील बाजूस आगीने पेट घेतल्याचे दिसून आले.

त्यानंतर चालकाने घोटवळ गावाच्या स्टॉपवरील पंजाबी ढाबा हॉटेलमध्ये जाऊन उपस्थिताना घटनेची माहिती दिली. तेथील ग्रामस्थांनी रेस्क्यू टीमच्या सागर दाहिंबेकर या तरुणाला कॉल करून याबाबत माहिती दिली. क्षणाचाही विलंब न करता टीम कोलाड व फायर ब्रिगेड धाटाव एमआयडीसी घटनास्थळी पोहचले. त्यांनी रात्री साडेदहाच्या सुमारास आगीवर नियंत्रण मिळविले. रामदान ड्रायव्हरच्या चलाखीने मोठा अनर्थ टळला. याबाबत टीम एसव्हीआरएसएस कोलाड व फायर ब्रिगेड कर्मचाऱ्यांचे कौतुक होत आहे.

## महायुतीबाबत फेरविचार करणार

पक्षाच्या नेत्यांनी रायगडमधील रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांवर अन्याय केला आहे. रायगड जिल्हा नियोजन सदस्यपदी त्याचप्रमाणे विविध शासकीय महामंडळावर सदस्य म्हणून मित्रपक्ष असलेल्या रिपब्लिकन पक्षाचा वाटा द्यायला पाहिजे होता, तो अद्याप दिला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये असंतोष खदखदत आहे. याबाबतही राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्याकडे कैफियत मांडली आहे, असे नरेंद्र गायकवाड यांनी सांगितले. त्याचा महायुतीच्या वरिष्ठांनी विचार करावा अन्यथा आम्हाला वेगळा विचार करावा लागेल, असा गंभीर् इशारा नरेंद्र गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिला.

## मुंबई-गोवा महामार्गावर भीषण अपघात

मृत्यू झाला. वैभव चौहान यांना किरकोळ दुखापत झाली आहे. स्थानिक नागरिक आणि पोलीसांच्या मदतीने अपघातग्रस्तांना तात्काळ पेणच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, परंतु वैदयकीय अधिकाऱ्यांनी दर्शन रहाटे यांना मृत घोषित केले.

घटनेनंतर पोलीसांनी अपघातग्रस्त वाहन वाजूला करून वाहतूक सूरळीत केली. संबंधित अज्ञात वाहनाचा शोध व घटनेचा तपास पेण पोलीस करत आहेत.

## शेतकऱ्यांना दिलासा?

दिशेने सरकण्याची तसेच २२ ऑक्टोबरच्या सकाळपर्यंत तीव्र होण्याची शक्यता आहे. तसेच २३ ऑक्टोबरपर्यंत पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरावर चक्रीवादळ निर्माण होईल. त्यानंतर, ते उत्तर पश्चिम दिशेने सरकून २४ ऑक्टोबरच्या सकाळपर्यंत ओडिशा-पश्चिम बंगाल किनारपट्टीपासून वायव्य बंगालच्या उपसागरात पोहोचण्याची दाट शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय झाले आहे. येत्या दिवाळीमध्ये पाऊस पडणार की नाही, याविषयी शंका व्यक्त केली जात होती. पण दिवाळीमध्ये हवामान कोरडे राहणार आहे. सध्या दक्षिण भारतामध्ये पाऊस सुरू आहे.

हवामान तज्ज्ञांच्या माहितीनूसार, मान्सून परत गेला तरी काही काळ पाऊस सुरूच राहतो. कारण राज्यावर बाष्प असते. तापमानही वाढलेले असते. यामुळे ढगांची निर्मिती होते आणि कमी वेळेत अधिक पाऊस पडतो. हीच स्थिती राज्यामध्ये निर्माण होत आहे. काही दिवस अशीच परिस्थिती असणार आहे आणि त्यानंतर हवामान कोरडे राहणार आहे. बंगालच्या उपसागरात दाना चक्रीवादळ २४ ते २५ ऑक्टोबरला उडिशाच्या किनारपट्टीवर तयार होणार आहे. त्याचा प्रवास उत्तर दिशेने होईल. त्याचा काहीही प्रभाव महाराष्ट्रावर होणार नाही. त्यामुळे पुढील आठवड्यात हवामान कोरडे राहणार आहे. संपूर्ण दिवाळीमध्ये पावसाची शक्यता नसल्याने नागरिकांना हा सण दणक्यात साजरा करता येणार आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE (SECOND CALL)**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/ DIVN/MHD/Tech/ Second Call / E-Tender-37/2024-25 Dtd. 22.10.2024. **RFx No. -** 7000033219 | **Sub:-** Second Call for SRM E-Tender for the work of repairing/overhauling of Air Compressors of 220kV/100kV CB at various Substations under EHV (O&M) Dn. Mahad for the year 2024-25. | Rs. 2,17,808/- (including GST + 1% Labour CESS) |
| 2. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/ DIVN/MHD/Tech/ Second Call / E-Tender-38/2024-25 Dtd. 22.10.2024. **RFx No. -** 7000033265 | **Sub:-** Second Call for SRM E-Tender for Supply of Discharge Rod at EHV(O&M) Division Mahad. | Rs.4,93,837/- including GST |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs.5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST.

Bid submission is from 22.10.2024 @ 00:00 hrs to 28.10.2024 @23:59 Hrs for above tender for further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O): Phone No.7373101089

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे बेंडसे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतींचे मालक काशिनाथ नारायण बांगर वगैरे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| २७/१/ब | ००-२५-३० | ३-०० |

सबब सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २२ ऑक्टोबर २०२४ **ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम. एल. एल. बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

दि.२१/१०/२०२३ अर्जदारातर्फे वकील एन.एन. पाटील.

**अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र.१९१/२०२४
निशाणी क्र.

सौ. रेश्मा ज्ञानेश्वर पाटील वगैरे ... अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही ...सामनेवाला

**जाहीर नोटिस**

सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की, सदरील अर्जदार क्र. १ व अर्जदार क्र. २ यांचे वडील कै. बाळाराम महादेव पाटील व आई. कै. कविता बाळाराम पाटील हे अनुक्रमे दिनांक २०/०५/२०२४ व २८/०७/२०२४ रोजी वायशेत, पो. नवगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथे मयत झालेले आहेत. कै. बाळाराम महादेव पाटील यांच्या नावे व त्यांच्या मालकीचे GLAMOUR हे दुचाकी वाहन व कै. कविता बाळाराम पाटील यांच्या नावे व त्यांच्या मालकीचे BOLERO SLX ISZ 2WD 7STR BS2 ही चारचाकी वाहन अर्जदारांच्या नावे होण्याकामी, तसेच त्यांच्या मृत्युपश्चात अर्जदार हे त्यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळण्याकरिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७, कलम अन्वये मा. न्यायालयाकडे दि. १७/१०/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणासही कसल्याही प्रकारचे म्हणणे वा हरकत दाखल करावयाची असल्यास अशा लोकांनी दि.१९/११/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात स्वतः वा त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीमार्फत हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. दि. १९/११/२०२४ रोजी वा तत्पूर्वी सदर वारस दाखला देणेबाबतच्या अर्जास कोणाचीही हरकत न आल्यास सदरील अर्जदाराला आवश्यक तो वारस दाखला देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि.२१ माहे ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/- लिपीक, दिवाणी न्यायालय व स्त. अलिबाग-रायगड
सही/- अधिक्षक, दिवाणी न्यायालय व स्त. अलिबाग-रायगड

# 51 हजार नवमतदारांची नोंदणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**महाराष्ट्राच्या राजकारणात काही वर्षांत मोठ्या प्रमाणात उलथापालथ होत आहे. या अस्थिर राजकारणामुळे लोकशाही प्रक्रियेतून तरुणवर्ग बाजूला जात असल्याचे दिसत होते. परंतु, रायगड जिल्ह्यात यासंदर्भात आशेचा किरण दिसत असून १८-१९ वयोगटांतील ५१ हजार नवमतदारांनी विधानसभा निवडणुकीसाठी नोंदणी केली आहे. मतदार नोंदणीची निरंतर चालणारी प्रक्रिया विधानसभा निवडणुकीसाठी शनिवार (ता. १९) रोजी थांबवण्यात आली. शेवटच्या दिवशी जवळपास साडेचार हजार नवमतदारांची भर पडल्याचे बोलले जात आहे.**

वयाची अठरा वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक भारतीय नागरिकाला मताधिकार प्राप्त आहे. परंतु, राजकारणात सतत होणारे पक्षांतर, सत्तांतरामुळे तरुणवर्ग निवडणुकीत भाग घेण्याबाबत उदासीन दिसतो. निवडणूक विभागाकडून या नवमतदारांची नोंदणी करून घेण्यासाठी अनेक उपक्रम राबवूनही त्यास प्रतिसाद मिळत नव्हता. अठरा वर्षे झाली तरी मतदार यादीत नाव नसणाऱ्यांची संख्या खूपच मोठी आहे. १८ ते १९ या वयोगटाची लोकसंख्येतील मतदारांची टक्केवारी साडेतीन टक्के आहे आणि मतदार नोंदणीतली टक्केवारी फक्त सव्वा टक्क्यांच्या आसपास आहे. २० ते २९ या वयोगटाची लोकसंख्येतली टक्केवारी १८ टक्के आहे. पण मतदार यादीतील टक्केवारी केवळ साडेतेरा टक्के आहे. ही तफावत सातत्याने वाढत चालली आहे.

महाड, पोलादपूर, श्रीवर्धन या तालुक्यातील बहुसंख्य तरुणवर्ग नोकरी-व्यवसायाच्या शोधात बाहेर पडतो. त्यामुळे त्यांची मतदार नोंदणी राहून जाते. आजही या तालुक्यांमधील स्थलांतरितांची संख्या मोठी आहे. याचा परिणाम येथील मतदानाच्या एकूण टक्केवारीवरून दिसून येतो. लोकसभा निवडणुकीदरम्यान अनेक प्रयत्न करूनही महाड, श्रीवर्धन या विधानसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढलेली नव्हती. आता मात्र नवमतदारांची संख्या वाढल्याचे दिसून येते.

> **महाड, श्रीवर्धन मतदारसंघात मतदानाचा टक्का नेहमी कमी राहिला आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे येथील बहुतांश तरुणवर्ग नोकरीसाठी स्थलांतरित होतात. याठिकाणी वयोवृद्ध मतदार जास्त आहेत. याउलट पनवेलमध्ये मतदारांची संख्या जास्त असली तरी तेथे कामासाठी आलेला तरुण वर्ग अधिक असून वयोवृद्धांची संख्या कमी आहे. यातील काही वयोवृद्ध मतदानासाठीही बाहेर पडू शकत नाहीत. यासाठी ८५ वर्षांवरील मतदारांसाठी गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. – किशन जावळे,**
> **जिल्हाधिकारी, रायगड**

> **मतदानाचा टक्का वाढण्यासाठी मतदार नोंदणी आवश्यक आहे. जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यात महाविद्यालयांमध्ये मतदान नोंदणीसंदर्भात जनजागृती करण्यात आली होती. त्याचबरोबर गावागावांत जाऊन प्रचार करण्यात आला होता. जिल्ह्यातील दुर्गम गावांमधील तरुण, तरुणींपर्यंत माहिती पोहोचवण्याचा प्रयत्न झाला होता. मच्छीमार, आदिवासी, कामगार यांच्यासाठी खास मोहिमा आयोजित करण्यात आल्या होत्या.**
> **–नितीन वाघमारे,**
> **उपजिल्हाधिकारी (निवडणूक)**



| विधानसभा | एकूण मतदार | ८५+ नागरिक | १८-१९ मधील नवमतदार |
|---|---|---|---|
| पनवेल | ६,४५,९१७ | ४,९३६ | १४,८५० |
| कर्जत | ३,१६,६०३ | ६,५४१ | ७,२६० |
| उरण | ३,३६,२२५ | ३,५६५ | ७,६९२ |
| पेण | ३,०६,५६१ | ४,३९८ | ६,४१० |
| अलिबाग | ३,०३,५९७ | ६,६७६ | ६,०८२ |
| श्रीवर्धन | २,६३,९२१ | २,८४७ | ३,९३५ |
| महाड | २,९५,२९६ | ६,८९६ | ५,३८३. |

# बहरलेल्या माळरानावर पर्यटकांची गर्दी

**। पाली । वार्ताहर ।**

जिल्ह्यातील विविध पठारांवर फिरताना पिवळी सोनकीची फुले, कारवीची निळी-जांभळी आकर्षक फुले लक्ष वेधून घेत आहेत. सुटीच्या दिवशी पर्यटक माथेरान, माणगाव, पोलादपूर, म्हसळा, तळा आदी सर्व तालुक्यांतील बहरलेला रानमाळ पाहण्यासाठी आवर्जून येतात. जांभळ्या-निळ्या रंगांची आकर्षक फुले पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहेत. मात्र, ही वनस्पती चक्क शिकारी असून मांसाहारी आहे. याबाबत अनेकजण अनभिज्ञ आहेत. युट्रीक्युलारिया हे या वनस्पतीचे शास्त्रीय नाव असून तिला सीतेची आसवे म्हणून ओळखले जाते.

वाऱ्यावर डोलणारी ही फुले पाहिली की डोंगरावर जणू जांभळा-निळा शालू पांघरल्याचा भास होतो. तर, कारवी ही डोंगर उतारांवर वाढणारी झुडूपवजा बहुपयोगी वनस्पती आहे. जिल्ह्यातील डोंगरदऱ्यांमध्ये, वनपट्ट्यांत ही उगवते. सध्या ती ठिकठिकाणी उगवली असून जांभळ्या रंगांची आकर्षक टपोरी फुले पाहून मन प्रसन्न होते. कारवीचे वैशिष्ट्य म्हणजे ही फुले एकत्रित बहरतात. त्यामुळे निसर्गसृष्टीचा एक अलौकिक रंग सोहळा असल्यासारखे वाटते.

> **जंगलात तसेच डोंगर उतारावर कारवीची फुले मोठ्या संख्येने बहरली आहेत. विळे-ताम्हिणी घाट सध्या या फुलांनी बहरला असून साधारण दोन-तीन आठवडे बहर टिकतो. ऊन वाढू लागले की फुले करपतात व बहर ओसरतो.**
> **फुलांमुळे पर्यटक अधिक आकर्षित होतात. स्थानिक आदिवासी कारवीच्या फांद्यांपासून कुडाची घरे करतात. कारवी पर्यावरण संवर्धनाचे म हत्त्वपूर्ण काम करते. तिचे जतन व संवर्धन होणे आवश्यक आहे.**
> **– राम मुंडे, पर्यावरण अभ्यासक, विळे-माणगाव**




● कोल्हापूर-पट्टणकडोली येथे वीर देवाच्या यात्रेला एक लाख भक्तांनी उपस्थिती लावली होती. भंडारा उधण्यात आल्याने परिसर पिवळा झाला होता. (छायाचित्र : सुधिर नाझरे)

# धर्मेंद्र मोरे यांच्या निवडीबद्दल कर्जतमध्ये सन्मान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

वंचित बहुजन आघाडीचे धर्मेंद्र मोरे यांची पक्षाचे रायगड जिल्हा महासचिव पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीचे नवनिर्वाचित जिल्हा महासचिव धर्मेंद्र मोरे यांचा कर्जत तालुक्याच्यावतीने सन्मान करण्यात आला.



वंचित बहुजन आघाडीचे नेते डॉ. प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशाने प्रदेश अध्यक्षा रेखा ठाकूर यांच्यामार्फत वंचित बहुजन आघाडीचे कर्जत तालुका अध्यक्ष धर्मेंद्र मोरे यांचे अनेक वर्षाचे काम पाहता पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर वंचित बहुजन आघाडीचे रायगड(उत्तर)जिल्हा महासचिव म्हणून जबाबदारी दिली आहे. कर्जत तालुक्यासह जिल्ह्यामध्ये अत्यंत उत्साहाचे वातावरण तयार झाले आहे. कर्जतमध्ये पक्ष कार्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात धर्मेंद्र मोरे शुभेच्छा देण्यासाठी कार्यकर्ते जमले होते. उत्तर रायगड जिल्ह्यातील कर्जत-खालापूर मतदार संघ आणि कर्जत शहरातील राजकीय धार्मिक सामाजिक शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# रंगीत रांगोळ्यांनी सजली बाजारपेठ

**। महाड । वार्ताहर ।**

भारतीय संस्कृतीमध्ये रांगोळी म्हणजे मांगल्याचे प्रतीक मानले जाते. ६४ कलांपैकी रांगोळीची कलादेखील महत्त्वाची मानली जाते. सण- उत्सव किंवा कोणतेही शुभ कार्य असले की दारासमोर रांगोळी हमखास काढली जाते. अवघ्या काही दिवसांवर आलेल्या दीपोत्सवात दारासमोर महिला वर्ग मोठ्या आवडीने रांगोळी काढतात. रांगोळीत भरल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या रंगांमुळे रांगोळी अतिशय आकर्षक दिसते. परंतु, रांगोळीत रंगीबेरंगी छटा तयार करण्याचे काम आता सोपे झाले आहे. बाजारपेठेमध्ये आता रंगीत रांगोळी उपलब्ध झाल्याने रांगोळीचे रंग तयार करण्याचा त्रास कमी झाला आहे. त्यामुळे महिला वर्गांचा रंगीत रांगोळी खरेदी करण्याकडे कल वाढत आहे.

जिल्ह्यातील बहुतांश सर्वच तालुक्यांमध्ये गुजरात व राजस्थानमधून रंगीत रांगोळी विक्री करणारे व्यापारी दाखल झाले आहेत. पांढरी रांगोळी बाजारात वर्षभर उपलब्ध असते. यामध्ये आपल्या आवडीनुसार वेगवेगळे रंग मिसळून रंगीत रांगोळी तयार केली जाते आणि रांगोळीच्या डिझाइनमध्ये रंग भरले जातात; परंतु आता बाजारपेठेत तयार रंगीत रांगोळी आली आहे. निळा, हिरवा, लाल, भगवा, गुलाबी अशा रांगोळीच्या असंख्य छटा विक्रीसाठी आहेत. बाजारपेठा, शहरांमधील विविध चौकांमध्ये राजस्थान व गुजरातमधील व्यापारी रांगोळी विक्रीसाठी बसले आहेत. तयार रांगोळी ४० ते ६० रुपये किलो दराने मिळत आहे. त्याबरोबरच विविध प्रकारचे तयार छाप बाजारात विक्रीस उपलब्ध आहेत. छोट्या-छोट्या चौकोनी व गोलाकार छापांपासून अगदी दोन फुटापर्यंतचे छाप विक्रीसाठी आले आहेत. रांगोळी वेगवेगळ्या प्रतीकांमध्ये काढली जाते. पारंपरिक ठिपक्यांच्या रांगोळीबरोबरच संस्कार भारती, सुलेखन रांगोळी, पानाफुलांच्या रांगोळीचे प्रकार सध्या प्रचलित झाले आहेत. यासाठी तयार रंगीत रांगोळीला अधिक पसंती मिळत आहे.

स्टिकरची रांगोळी ही रेडिमेट प्रिंटेड रांगोळी असून हव्या त्या जागी फक्त चिकटवायची असते. या स्टिकरमुळे वेळ वाचतो, तसेच रांगोळी मोडण्याची, खराब होण्याची शक्यता नसते. सध्या बाजारात लक्ष्मीच्या पावलांचे स्टिकर्स, तोरण रांगोळीचे स्टिकर्स तर अगदी छोटे रांगोळीचे स्टिकर्स १० रुपयांपासून उपलब्ध आहेत. मोठ्या रांगोळीचे स्टिकर्स ५० रुपयांपर्यंत आहेत. यातही आता स्टोन लावलेले, थ्री डी डिझाइन्स असलेल्या रांगोळीला पसंती मिळत असल्याचे दिसून येते.

> **दीपोत्सवात रांगोळीला विशेष महत्त्व आहे. तयार रंगीत रांगोळी बाजारात मिळू लागल्याने आता रांगोळी काढण्यासाठी व रंग तयार करण्यासाठी लागणारा वेळ वाचला आहे. तसेच, खर्चाचीही बचत झाली आहे.– स्वाती पाटील, ग्राहक**

> **रंगीत रांगोळी आम्ही गुजरात येथून आणली आहे. दिवाळीच्या हंगामामध्ये आम्ही वेगवेगळ्या ठिकाणी अशी विक्री करतो. याला महिलांचा प्रतिसादही चांगला मिळत असून काहीजण एक-एक किलो रांगोळी खरेदी करतात.**
> **– मनोज कवाडिया, विक्रेता**

# आरसीएफच्या थळ प्रकल्पात आता मिश्र खतांची निर्मिती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

थळ येथे मिश्र खत निर्मिती प्रकल्प उभारण्याचा आरसीएफ कंपनीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने एल ॲण्ड टी कंपनीला हा प्रकल्प उभारण्याचे कंत्राट दिले असून, २७ महिन्यांत हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. हा विस्तार भूसंपादन न करता होणार आहे. या प्रकल्पात युरिया आणि अमोनिया खतांची निर्मिती होते. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे खताच्या आयातीचे प्रमाण कमी होणार असून मिश्र खताच्या किमती कमी होण्याची शक्यता आहे.

आरसीएफ खत निर्मिती प्रकल्पातून सध्या युरिया आणि अमोनिया खताची निर्मिती करण्यात येत आहे. आता प्रकल्पाचा विस्तार होणार असून युरिया आणि अमोनियाबरोबरच मिश्र खतांची निर्मिती करण्यात येणार आहे. यासाठी एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक कण्यात येणार असून, प्रकल्पातून दररोज १२०० मेट्रिक टन मिश्र खत तयार करण्याचा प्रयत्न असेल. डीएपीसारख्या मिश्र खतांना बाजारात मोठी मागणी आहे. मात्र, भारतात त्याचे फारसे उत्पादन होत नसल्याने त्याची आयात करावी लागते.

मिश्र खतांची मागणी २०१८-१९ मध्ये साडेसहा हजार दशलक्ष टनावर पोहोचली होती. त्यानंतर रशिया-युक्रेनमधील युद्ध स्थितीमुळे त्याच्या आयातीवर परिणाम झाला होता. ही बाब लक्षात घेऊन आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत देशांतर्गत मिश्र खतांच्या निर्मितीवर भर देण्याचा निर्णय घेण्यात आला. याचाच एक भाग म्हणून केंद्र सरकारने मिश्र खत निर्मिती प्रकल्प उभारणीस मान्यता दिली.

कंपनीच्या संचालक मंडळाने प्रकल्प उभारणीचे कंत्राट मंजूर केले आहे. त्यामुळे येत्या दोन महिन्यांत कामाला सुरुवात होणार आहे. देशांतर्गत मिश्र खतांचे उत्पादन सुरू झाल्यामुळे खतांच्या किमती कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्याचा फायदा हा शेतकऱ्यांना होणार असल्याचे बोलले जाते.

## विजय कोळी यांचे निधन

**रेवदंडा :** रविवार, दि. २० ऑक्टोबर रोजी रेवदंडा-मोठा कोळीवाडा येथील विजय कृष्णा कोळी यांचे निधन झाले. त्यांचा अंत्यविधी तथा सर्व उत्तरकार्य त्यांच्या रेवदंडा येथील राहत्या घरी करण्यात येतील. मुंबई येथील जन्म आणि किशोरवयीन अवस्था जगलेले पण शहराच्या धकाधकीच्या आयुष्याला कंटाळलेले विजय कोळी यांनी रेवदंड्याची कन्या शुभांगी रागा यांच्यासोबत प्रेमविवाह केला आणि रेवदंडा येथे कायमचे स्थायिक झाले. इलेक्ट्रिकल, प्लंबिंग यांची कामे करणारे विजय कोळी हे दोस्तीतच्या दुनियेतील राजा माणूस होते.

परिसरात त्यांना भावजी याच नावाने ओळखले जायचे. गेले सहा महिने त्यांची प्रकृती खालावली होती. त्यांच्यावर वैद्यकीय उपचार देखील करण्यात आले होते.

# बबनदादा पाटील यांच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे एकनिष्ठ नेते, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख तथा पनवेल उरण महाविकास आघाडीचे अध्यक्ष बबनदादा पाटील हे गेले कित्येक दिवस नवीमुंबईतील कोपरखैरणे येथील कोकीलाबेन धीरुबाई अंबानी रुग्णालयात दाखल होते. नुकतीच त्यांच्यावर शस्त्रक्रिया देखील कारण्यात आली होती. सोमवारी बबनदादा पाटील यांना रुग्णालयातून सोडण्यात आले. दरम्यान रुग्णालयाबाहेर असंख्य कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती.

ऐन विधानसभा निवडणुका तोंडावर असताना बबनदादा हे कोणत्याही कार्यक्रमात उपस्थित राहिलेले दिसत नव्हते. यामुळे विधानसभा निवडणुकांमध्ये पनवेल उरण महाविकास आघाडीमध्ये काही बिघाडी झाली आहे का? अशा चर्चांना उत आला होता. मात्र, यामागचे कारण ते रुग्णालयात उपचार घेत असल्याची माहिती समोर आली. बबनदादा पाटील यांच्यावर नवी मुंबईतील कोपरखैरणे येथील कोकीलाबेन धीरुबाई अंबानी रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली. दरम्यान रुग्णालयाबाहेर दादांच्या असंख्य चाहत्यांनी गर्दी केली होती. सोमवारी बबनदादा यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या असून प्रचाराच्या धुमाळीला चांगलीच सुरुवात झाली आहे.

दरम्यान, बबनदादा हे तंदुरुस्त होऊन प्रचारासाठी मैदानात उतरतील, असा विश्वास कार्यकर्त्यांना आहे.

## सुरगडाच्या शिलेदारांचा ऐतिहासिक वारसा

# शिवकालीन तोफेचे केले संवर्धन

**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील ऐतिहासिक शिवकालीन असलेल्या दुर्ग सुरगडावर रविवार २० ऑक्टोबर २०२४ रोजी स्थानिक सुरगड संवर्धन संस्थेची अखंड गडसंवर्धन ३४ वी मोहीम यशस्वीपणे संपन्न झाली. या मोहिमेमधे सुरगडाच्या शिलेदारांनी एका ऐतिहासिक शिवकालीन तोफेच्या संवर्धनाचे कार्य या मोहिमेतून केले. गडावरील ही तोफ काही समाजकंटकांनी गडावरून खाली ढकलली असावी. तसेच वातावरणातील बदलामुळे आणि मुसळधार पडणाऱ्या पावसामुळे ही तोफ काळाच्या ओघात नाहीशी होण्याआधी तीला योग्य स्थान देणे महत्वाचं होतं. याच हेतूने गडाच्या घेऱ्यात अस्थाव्यस्थ पडलेल्या या तोफेला पुनः उभारी देत गडदैवता अन्साई देवीच्या प्रांगणात वीराजमान करायचे असा संकल्प दसरा शस्त्रपुजनाच्या मोहिमेमधे करण्यात आला. हा संकल्प सुरगडाच्या शिलेदारांनी या मोहिमेच्या माध्यमातुन पूर्ण करत या तोफेचे सुरक्षित संवर्धन करण्यास यश मिळवले.



मागील दोन वर्षापासून येथील स्थानिक सुरगड संस्थेचे शिलेदार या गडाचे संवर्धन आणि संरक्षण करत स्वच्छता तसेच पारिसरात विविध उपक्रम राबवत त्याची जनजागृती करतात. त्याच बरोबर नवरात्रौत्सव काळात गड पूजन आणि शस्त्र पूजन तोरण बांधले जातात तसेच दिवाळी पहाट गडावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करून साजरी करतात. तर गड संवर्धन करण्यासाठी येथील शिलेदार तन, मन, धन तसेच आपली शिदोरी घेऊन आठवड्यातील एक रविवार गडसंवर्धन कार्यासाठी देत असतात.

यावेळी तोफ संवर्धन कार्यात किशोर सावरकर, ललित जाधव, मंदार पार्टे, निलेश जाधव, साहिल जाधव, रोशन जाधव, अजित कदम, गणेश मांडे, पंकज सावरकर, पार्थ सावरकर, सिद्धेश शेलार, मनिष धामणसे, प्रथमेश चोरगे, श्रीयोग देशमुख, ललित पवार, विराज तेलंगे, रोहित सानप, अथर्व कापसे, श्रुतिक महाबळे, सुयोग लोखंडे, महेंद्र पार्टे (गडपाल) आदींनी अथक परिश्रम घेत ही मोहीम यशस्वी करून तोफेचे संवर्धन केले.

> **बरीच वर्ष ही तोफ गडाच्या घेऱ्यात अस्थाव्यस्थ पडून होती. काळाच्या ओघात ती अधिक मातीत गाडली जाऊ नये, त्याचबरोबर तिची वातावरणातील बदलाने झीज होऊ नये यासाठी तिला योग्य स्थानी स्थानपन्न करणे गरजेचे होते. ही तोफ गडावर चढवणे अशक्य होते. त्यानुसार देवीच्या प्रांगणात ती सुरक्षीत ठेवण्यात आली.**



# रेडिमेड किल्ल्यांना ग्राहकांची पसंती

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

दिवाळी सणमध्ये ग्रामीण भागामध्ये दगड, वीटा, मातीपासुन किल्ले तयार केले जातात. मात्र, शहरांमध्ये किल्ले बनविण्यात अनेक समस्या निर्माण होत असल्यामुळे पीओपीपासून तयार केलेले रेडीमेंट किल्ले विकत घेत असल्याने या किल्ल्यांना मागणी वाढली आहे. यामुळे किल्ले बनविण्याऱ्यांचा व्यवसाय तेजीत आला आहे.

ग्रामीण भागात जरी लहान मुले किल्ले बनवत असली तरी शहरात हवे तेवढी जागा उपलब्ध नसल्याने अनेक जण रेडीमेंट किल्ल्यांना पसंती देत असल्याचे दिसून येते. त्यामुळे या किल्यांचे मुल्य ही वाढलेले आहे. सध्या तयार असलेल्या किल्ल्यांनाही चांगली मागणी असून शंभर रुपयांपासून हजार रुपयांपर्यंत ते विकत मिळत आहेत.

हे किल्ले वजनाने हलके असल्यामुळे दिवाळी नंतर ते घरात कोठेही ठेवता येतात. किल्ले प्रेमींची मागणी असेल त्यानुसार किल्ले बनवून दिले जातात. त्यामुळे अशा किल्ल्यांना चांगलीच मागणी असल्याचे दिसते. हे किल्ले आकर्षक दिसत असल्यामुळे हे किल्ले आवर्जुन खरेदी करीत असल्यांचे दृश्य या मार्गावर पहावयास मिळत आहे.

विशेषकरुन बच्चे कंपनीला या किल्ल्यांची चांगलीच भुरळ पडत आहे. किल्ला बनवायचा म्हटले की, माती विटा रंग या सर्व गोष्टीची आवश्यकता असते. तसेच प्रत्येकांकडे वेळेची मर्यादा अल्प असल्याने अनेक जण रेडीमेंड किल्ले खरेदी करण्याला पसंती देत आहेत. किल्ला विक्रीतून चांगला रोजगार मिळत असल्याचे किल्ले व्यावसायिकाने सांगितले.

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# न्यायमूर्तींचा ईश्वर

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड येत्या दहा नोव्हेंबरला निवृत्त होतील. त्यांना सरन्यायाधीशपदावर बराच कार्यकाळ मिळाला. यामध्ये आपण कसे काम केले याबाबत जनता आपले मूल्यमापन भविष्यात कसे करील याबाबत आपल्याला हुरहूर वाटत असल्याचे चंद्रचूड यांनी अलिकडेच एका व्याख्यानात म्हटले होते. चंद्रचूड हे आपल्या कार्यकाळात अनेकदा साप्ताहिक सुट्ट्यांमध्ये विविध ठिकाणी व्याख्याने वा परिसंवादांमध्ये भाग घेण्यासाठी जाताना दिसत. या व्याख्यानांमध्ये ते राज्यघटना, लोकशाही याबाबत बरेच विचार प्रकट करीत असत. आता त्यांचा कार्यकाळ संपत आल्याने त्यांच्या भाषणातून निरोपाची आणि निरवानिरवीची भाषा प्रकट होताना दिसते. नुकतेच ते गोव्यात आणि नंतर पुण्यात येऊन गेले. गोव्यात बोलताना त्यांनी सर्वोच्च न्यायालय हे जनतेचे न्यायालय आहे अशी भूमिका मांडली. हे न्यायालय लोकांच्या प्रश्नांबाबत विचार करण्यासाठी आहे, मात्र संसदेतील विरोधी पक्षाप्रमाणे त्याने कामगिरी करावी अशी केली जाते ती चुकीची आहे असेही ते म्हणाले. न्यायालयाने निःपक्षच असले पाहिजे व कोणत्याही पक्षासारखे काम करता कामा नये हे त्यांचे म्हणणे योग्यच आहे. पण लोकशाहीमध्ये न्यायालयांनी सरकारवर अंकुश ठेवावा अशी अपेक्षा असते. केंद्रातील सत्तारुढ पक्ष संसदेतील बहुमताच्या जोरावर वाटेल ते कायदे संमत करू शकतो. उदाहरणार्थ, एखाद्या पक्षाला समजा चारशेपार जागा असतील तर तो राखीव जागा रद्द करू शकतो किंवा पत्रकारांचे स्वातंत्र्य काढून घेऊ शकतो. अशा बहुमतवाल्या सरकारचे कायदे केवळ सर्वोच्च न्यायालयच बेकायदा ठरवू शकते. राज्यघटनेने तो अधिकार नव्हे, तर ती जबाबदारी न्यायालयांवर सोपवलेली आहे. याखेरीज केंद्र वा राज्य सरकारे पोलिस, इडी, सीबीआय इत्यादींचा गैरवापर करीत असतील, बुलडोझर लावून सामान्यांची बांधकामे पाडत असतील किंवा कोरोना काळात लस देताना भेदभाव करीत असतील तर न्यायालयांनाच हस्तक्षेप करावा लागतो. नव्हे त्यांनी तो करणे अपेक्षितच असते.

### खटल्यातील वेळकाढूपणा

असा हस्तक्षेप हा कोणत्याच सरकारला आवडत नसतो. त्याला व त्याच्या भक्तांना असे वाटते की न्यायालय विरोधी पक्षासारखे किंवा त्यांच्या मतानुसार वागत आहे. हा समज चुकीचा असतो. न्यायालय केवळ राज्यघटनेनुसार वागत असते व आपले कर्तव्य पार पाडत असते. या बहुतेक प्रकरणांमध्ये केंद्र वा राज्य सरकारे नाराज होतात. सत्तारुढ पक्षाचे लोकही नाराज होतात. पण त्यांच्या नाराजीची पर्वा न्यायालयांनी करायची नसते. चंद्रचूड यांच्या कार्यकाळात त्यांनी काही निर्णय याप्रमाणे घेतले. उदाहरणार्थ निवडणूक रोख्यांच्या नावाखाली मोदी सरकारने जे हजारो कोटी रुपये बेकायदा जमा केले त्याबाबत न्यायालयाने ताशेरे ओढले. योजना बेकायदा ठरवून बंद करायला लावली. त्यामुळे मोदी सरकारचा भ्रष्टाचार उघडा झाला. याबद्दल सर्वांनीच न्यायालयाचे स्वागत व कौतुक केले. मात्र या जमा झालेल्य पैशांची व त्या बदल्यात कंत्राटे दिली गेली का याची न्यायालयीन चौकशीही व्हायला हवी होती. तरच हे प्रकरण तडीला गेले असते. ते झाले नाही. कदाचित न्यायालयाने आपल्या समोर असलेल्या याचिकेपुरता निर्णय घेतला व कायद्याच्या चौकटीत राहून काम केले असे म्हणता येईल. पण न्याय नुसता होऊन चालत नाही. तो झालेला दिसावाही लागतो. निवडणूक रोखे बेकायदा ठरले. पण त्यातून जमा झालेले पैसे त्या त्या पक्षांकडेच राहिले. ते काही सरकारजमा झाले नाहीत ही उणीव राहिलीच. तरीही लोकांनी न्यायालयांच्या निर्णयाचे स्वागतच केले. मात्र याच चंद्रचूडांच्या न्यायालयाने महाराष्ट्रातील शिवसेना व राष्ट्रवादीतील फुटीबाबतचा फैसला लोंबकळत ठेवला. म्हणजे त्या प्रकरणात अपेक्षित ते कर्तव्य पार पाडले नाही. शिंदे यांचे प्रतोद म्हणून भरत गोगावले यांची नियुक्ती यांनी बेकायदा ठरवली, राज्यपालांनी विश्वासदर्शक ठराव मांडण्यासाठी अधिवेशन बोलावण्याचा दिलेला आदेश बेकायदा ठरवला, मात्र या सगळ्यांमुळे ज्यांचा फायदा झाला त्या शिंदे सरकारला याच न्यायालयाने रद्दबातल ठरवले नाही.

### राज्यघटना हाच देव

शिवसेना व राष्ट्रवादी फुटीबाबत राहुल नार्वेकर यांनी जो निर्णय दिला आहे त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. चंद्रचूडांनी निवृत्त होण्याच्या आत त्यावर निर्णय देणे आवश्यक होते. पण यापुढे ते असंभव आहे. आता नवीन सरन्यायाधीशांच्या काळात या प्रकरणाची पुन्हा पहिल्यापासून नव्याने सुनावणी करावी लागेल. त्यात किती वेळ जाईल व त्याचा निकाल कधी लागेल हे सांगता येत नाही. वास्तविक हे सर्व येत्या विधानसभा निवडणुकीच्या आत होणे अपेक्षित होते. गेल्या वर्षी राहुल नार्वेकर वेळकाढूपणा करीत होते तेव्हा याच कारणास्तव चंद्रचूड यांनी त्यांना झापले होते. मात्र नंतर सर्वोच्च न्यायालयानेच वेळकाढूपणा केला. न्यायाला दिरंगाई म्हणजे न्यायाला विरोध असे वचन आहे. ते यात तंतोतंत लागू होते. असो. दरम्यान, चंद्रचूड यांनी पुण्याजवळ आपल्या मूळ गावाला भेट देऊन देवदर्शन केले. आपल्या कामामध्ये परमेश्वराची कशी मदत होते हेही त्यांनी सांगितले. अयोध्येचा निकाल देताना आपण देवाची प्रार्थना केली व आपल्याला मार्ग दिसला असेही ते म्हणाले अशा बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. त्या खऱ्या असतील तर या देशाचे कठीण आहे इतकेच म्हणावे लागेल. एक म्हणजे सरन्यायाधीशांसारख्या व्यक्तीने आपल्या खासगी श्रध्देचे असे जाहीर प्रदर्शन करणे कितपत योग्य आहे हाच प्रश्न आहे. दुसरे म्हणजे कोणत्याही खटल्याचा निकाल हा कायद्यानुसार व साक्षीपुराव्यांच्या आधारे करायचा असतो. त्यात न्यायमूर्ती मंडळी ईश्वराची करुणा भाकून त्याच्या प्रेरणेने काही निर्णय करून लागले तर ते कठीण होईल. शिवाय, एखादा मुस्लिम न्यायाधीश अल्लाह किंवा ख्रिश्चन न्यायाधीश येशूच्या प्रेरणेने आपण निकाल करतो असे म्हणाला तर सध्याच्या हिंदुत्ववादी सरकारला व भक्तांना चालेल काय? न्यायालयांसाठी राज्यघटना आणि कायदा हेच परमेश्वर असायला हवेत. देशाच्या सरन्यायाधीश वयाच्या ६५ व्या वर्षी निवृत्त होताना याची आठवण करून द्यावी लागावी हेच विचित्र आहे.

---

विचार

# कॅनडाबरोबरचे नाराजीनाट्य

***हरदीपसिंग निज्जर या शीख फुटीरतावाद्याच्या हत्या प्रकरणात भारतीय उच्चायुक्त आणि राजनैतिक अधिकाऱ्यांवर कॅनडाकडून निराधार आरोप झाले आणि पुढील मोठे नाराजीनाट्य घडले. त्यामुळे कॅनडाच्या राजनयिक अधिकाऱ्यांची भारतातून हकालपट्टी करणे हा स्वागतार्ह निर्णय ठरला. एव्हाना भारत-कॅनडा संबंधांमधील दुरावा हा बहुचर्चीत विषय बनला आहे. यामुळे भारताच्या सन्मानाचा जगभरात यथोचित आदर राखला जाईल.***



**शंतनु चिंचाळकर**

भारताने आजवर आपल्या मुत्सद्दी राजकीय धोरणाद्वारे जगभरातल्या प्रमुख देशांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित केले. दहशतवादी आणि फुटीरतावादी शक्तींशी दोन हात करत जगात स्वतःचे असे एक स्थान निर्माण केले. देशांतर्गत आणि परदेशात घडणाऱ्या काही घटना बरेचदा संभ्रमावस्थेत नेतात. त्यातून परस्परसामंजस्याने मार्ग काढण्यासाठी भारताने नेहमी पुढाकार घेतला. अर्थात जिथे आत्मसन्मानाचा प्रश्न उभा राहिला, तिथे काही कठोर निर्णय घेण्याचाही खंबीरपणा दाखवावा लागला. कॅनडामध्ये शीख फुटीरतावाद्याच्या झालेल्या हत्येनंतर उद्भवलेल्या परिस्थितीत जगाला त्याचा प्रत्यय आला. या विषयावरुन तापलेले वातावरण एका अनपेक्षित, दुर्दैवी वळणावर येऊन ठेपले असताना परराष्ट्रीय धोरणात भारताने एक खंबीर पाऊल उचलल्याचे मात्र पहायला मिळत आहे. भारतासारखा विकसनशील देश जगभरातल्या देशांशी व्यापारातून वृद्धी, दहशतवादाशी लढा आणि साधन सामुग्रीबाबत आत्मनिर्भरता या तत्वांवर संबंध ठेऊन पुढे जात असतो. कॅनडा सरकारशी आलेल्या वितुष्टापायी त्या धोरणाला कुठे तरी आडकाठी येते. हरदीपसिंग निज्जर या फुटीरतावादी शीख नेत्याची ब्रिटिश कोलंबिया(बीसी), कॅनडामधील सरे येथील गुरुद्वाराबाहेर, पार्किंगमध्ये गोळ्या झाडून निर्घृण हत्या करण्यात आली. हरप्रीतसिंग निज्जर हा मूळचा जालंधरजवळचा रहिवासी होता, पण तो बराच काळ कॅनडामध्ये राहत होता. त्याचे अनेक प्रतिबंधित शीख संघटनांशी संबंध होते. पंजाबमध्ये काही काळापूर्वी झालेल्या हिंदू नेत्यांच्या टार्गेट किलिंगमध्येही त्याचा हात होता. तो बीसी मधील प्रमुख शीख नेता आणि वेगळ्या खलिस्तानी राज्याचा मुख्य समर्थक होता. अलीकडच्या काही महिन्यांमध्ये अनपेक्षितपणे मरण पावलेली निज्जर ही तिसरी खलिस्तानवादी प्रमुख शीख व्यक्ती आहे. खलिस्तान लिबरेशन फोर्सचा प्रमुख अवतारसिंग खांडा, परमजीतसिंग पंजावर यांच्या हत्यांनंतर निज्जर याची हत्या झाली. पंजाबमध्ये काही काळापूर्वी झालेल्या हिंदू नेत्यांच्या टार्गेट किलिंगमध्ये त्याचा हात होता. सप्टेंबरमध्ये कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी निज्जरच्या हत्येमागे भारताचा हात असल्याचा निराधार आरोप केला आणि कॅनडाच्या गुप्तचरांनी त्यांचा मृत्यू आणि भारतीय एजंट यांचे संबंध असल्याचे मत मांडले. भारत सरकारने या हत्येमध्ये कोणत्याही प्रकारे आपला हात असल्याचा इन्कार केला. एवढेच नव्हे, तर आपल्यावर होत असलेल्या निराधार आरोपांमागे कॅनडास्थित शीख समुदायाच्या वोट बँकेचे राजकारण आहे, हे ठणकावून सांगितले.

हरप्रीतसिंग निज्जर या ४५ वर्षीय शीख नेत्याच्या हत्येनंतर निर्माण झालेल्या प्रक्षोभामुळे काही गटांनी भारताच्या लोकसंख्येच्या सुमारे दोन टक्के असलेल्या धार्मिक अल्पसंख्याक शीखांसाठी कॅनडामध्ये स्वतंत्र मातृभूमीची मागणी केली. त्यामुळे हवालदील झालेल्या कॅनडा सरकारकडून आपला नाकर्तेपणा झाकण्यासाठी निज्जर यांच्या मृत्यूला भारत सरकार जबाबदार असल्याचा निराधार आरोप करण्यात येत आहे. त्याचा परिणाम भारत आणि कॅनडा यांच्यातील राजनैतिक संबंधांवर होऊन ते ताणले गेले. भारताने याबाबत कठोर भूमिका घेऊन, कॅनडातील आपल्या उच्चायुक्त आणि अन्य राजनैतिकांना परत बोलावण्याचा निर्णय घेतला. अलीकडच्या काळात हिंसाचार आणि दहशतवाद याच्या छत्रछायेखाली असलेल्या कॅनडामध्ये आपल्या राजनैतिक अधिकाऱ्यांचे राहणे सुरक्षित नसल्याचे सांगून भारताने त्यांना परत बोलाऊन घेतले. त्याच वेळी कॅनडाच्याही सहा अधिकाऱ्यांची भारतातून हकालपट्टी करण्याचा निर्णय घेतला. खलिस्तान चळवळीला भारताने पूर्वीपासून कडाडून विरोध केला आहे. १९८० च्या दशकात पंजाबमध्ये खालिस्तान या वेगळ्या राज्याची चळवळ शिखरावर होती. त्यामध्ये अनेक हिंसक हल्ले आणि मृत्यू झाले. सशस्त्र दलांनी चळवळीविरुद्ध विशेष कारवाया केल्यानंतर या संदर्भातील देशांतर्गत वाफ कमी झाली, परंतु परदेशस्थित खलिस्तानवादी समुदायातील समर्थकांनी वेगळ्या राज्यासाठी आपले आंदोलन चालू ठेवले, जे अलिकडच्या वर्षांमध्ये तीव्र झाले.

पंजाबसह देशातील सर्व मुख्य राजकीय पक्षांनी हिंसाचार आणि फुटीरतावादाचा निषेध केला आहे. भारताने म्हटले की निज्जर हा एक खलिस्तानी दहशतवादी होता आणि त्याने एका अतिरेकी फुटीरतावादी गटाचे नेतृत्व केले. हरदीपसिंग निज्जरच्या हत्येप्रकरणी कॅनडाच्या पोलिसांनी चार भारतीयांना अटक केली होती. कॅनेडियन पोलिसांचे तपास पथक असलेल्या इंटिग्रेटेड होमिसाईड इन्व्हेस्टिगेशन टीमने सांगितले की त्यांनी या प्रकरणी, यापूर्वीच करण ब्रार, कमलप्रीत सिंग आणि करणप्रीत सिंग यांना अटक केली होती. आता त्यांनी चौथा आरोपी असलेल्या अमनदीप सिंग नावाच्या व्यक्तीला अटक केली असून त्याच्यावर फर्स्ट डिग्री खून आणि कॅनेडियन नागरिक हरदीपसिंग निज्जरच्या हत्येचा कट रचल्याचा आरोप लावला आहे. हत्याकांडात अटक करण्यात आलेल्या चौथ्या आरोपीवर यापूर्वीच शस्त्र तस्करीचा गुन्हा नोंद असून तो पोलीस कोठडीत आहे. कोठडीत असलेल्या आरोपीवर हत्येचा आणि कट रचल्याचा आरोप नव्याने ठेवण्यात आला आहे. अल्पसंख्याकांच्या मतांवर डोळा ठेऊन एकूण प्रकरण हाताळले जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

भारतातील वाँटेड दहशतवाद्यांच्या ४० नावांच्या यादीत निज्जरचा समावेश होता. त्या आधारे कॅनडाच्या सरकारने भारतावर निज्जरच्या हत्येचा आरोप केला. भारत आणि कॅनडामधील संबंध ताणले जायला आणखी एक घटना कारणीभूत झाली. टोरंटो कार्यक्रमातील काही पोस्टर्समध्ये 'किल इंडिया' असे लिहिले होते आणि कॅनडातील भारतीय मुत्सद्दींचे वर्णन 'मारेकरी' असे केले होते. त्यामुळे भारत सरकारने कॅनडाच्या राजदूताला पाचारण केले होते. निज्जर हे स्वतंत्र शीख राज्याच्या प्रश्नावर सप्टेंबरमध्ये सरे येथे नॉन-बाइंडिंग सार्वमताची योजना आखत होते. ते खलिस्तानच्या निर्मितीबाबत एकमताचे मूल्यांकन करण्याच्या उद्देशाने होणाऱ्या जागतिक सर्वेक्षणाचा एक भाग होते. निज्जर यांच्या हत्येबाबत कॅनडाच्या सरकारने केलेल्या आरोपानंतर दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधही मंदावले. भारताने जस्टिन ट्रुडो सरकारकडे या हत्याकांडात भारताच्या सहभागाचे पुरावे मागितले. मात्र आजपर्यंत असे कोणतेच पुरावे मिळालेले नाहीत. भारत आणि कॅनडाच्या संबंधांमध्ये तणाव निर्माण होण्याच्या दरम्यान कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांचे माजी सहयोगी आणि न्यू डेमोक्रॅटिक पार्टीचे (एनडीपी) नेते जगमीत सिंग यांनीही आपली भूमिका मांडण्यास सुरुवात केली आहे. कॅनडातील शीख भयभीत आणि त्रस्त असल्याचा दावा त्यांनी केला. या खलिस्तान समर्थक खासदाराने कॅनडाच्या सरकारने या प्रकरणी कारवाई करावी, अशी मागणी केली. त्याने भारतावर राजनयिक निर्बंध घालण्याची विनंती केली. जगमीत सिंग यांनी एक निवेदन जारी करून आपल्या राजनैतिक मुत्सद्दींना बाहेर काढण्याच्या भारताच्या निर्णयाला पाठिंबा देताना त्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नेटवर्कवर कॅनडामध्ये बंदी घालावी, ही मागणीदेखील केली.

जगमित सिंग म्हणतो की, कॅनडाच्या भूमीवर गुन्हेगारी कार्यात गुंतलेल्या कोणालाही गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. कॅनडामधील राजकीय गणिते अलिकडे बदलत आहेत. येथिल रॉयल कॅनेडियन माउंटेड पोलिसांनी जारी केलेल्या माहितीनुसार त्यांचा पक्ष अत्यंत चिंतेत आहे. जगमितच्या मते कॅनडातील शीख समुदाय घाबरला आहे. याचे कारण भारतीय अधिकाऱ्यांकडून कथित धमक्या, छळ आणि हिंसाचार होत आहे. हरदीपसिंग निज्जर यांच्या हत्येमध्ये भारतीय अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचे विश्वसनीय पुरावे कॅनडाकडे असल्याचा आरोप त्याने केला आहे.

तो सांगतो, 'कॅनडाच्या भूमीवर हरदीपसिंग निज्जरच्या हत्येत नरेंद्र मोदी सरकारचा हात असल्याचे विश्वसनीय पुरावे कॅनडाकडे फार पूर्वीपासून आहेत. संबंधित गुन्ह्यांसाठी अमेरिकेने यापूर्वीच अनेकांना दोषी ठरवले आहे.' स्वतःच्या देशात अतिरेक्यांना आश्रय देऊन अतिरेकी कारवायांना प्रोत्साहन देणे, ही चोरी अंगलटी आल्यावर उद्भवलेल्या परिस्थितीचा दोष दुसऱ्याला देणे यातून राजकीय फायद्यासाठी उपयोग करून घेण्याचा डाव स्वतःवरच कसा उलटतो, याचे जिवंत उदाहरण कॅनडाच्या निमित्ताने पहायला मिळत आहे. भारतासारखा विकसनशील देश जगभरातल्या देशांशी व्यापारातून वृद्धी, दहशतवादाशी लढा आणि साधन सामुग्रीबाबत आत्मनिर्भरता या तत्वांवर संबंध ठेऊन पुढे जात असतो. कॅनडा सरकारशी आलेल्या वितुष्टापायी त्या धोरणाला कुठे तरी आडकाठी येते.

---

आजकाल

# लोक इतकी खरेदी का करतात?



**संजीव चांदोरकर**

सध्याचे दिवस सणासुदीचे. हळुहळु मार्केट मध्ये ग्राहकांची गर्दी वाढत आहे. कशासाठी? फक्त वस्तुंसाठी? नाही. वस्तू तर फक्त एक माध्यम आहे.

काही वर्षांपूर्वी मार्केटने लोकांना सांगितले, सतत हॅमर केले ''खूप खरेदी केली कि खूप आनंद मिळतो''.

कोट्यवधी नागरिकांनी पिढ्यान्‌पिढ्या आर्थिक विवंचनेत काढलेल्या; या अनादी भुकेल्या कोट्यवधी नागरिकांना वाटले कि ''मार्केट'' तर अगदी आपल्या मनातलंच सांगतय.

लोकांना खरतर पोचायचे असते. ''आनंदा''च्या गावाला; ते त्यांच्या डीएनएमध्ये प्रोग्रॅम्ड आहे; आनंदाच्या गावाला पोचणे, मनमुराद आनंद हेच तर जीवनाचे इप्सित आहे.

मार्केटने या भौतिक वांचितावस्थेचा, मानसिकतेचा अभ्यास करून ''आनंद'' म्हणजेच जास्तीत जास्त खरेदी असे समीकरण हॅमर केले. ते नैतिक, साधी राहणी, लेक्चर बाजी करून जाणारे नाही.

असो मग मार्केटने शासनाच्या धोरणकर्त्यांच्या/टाऊन प्लॅनर्सच्या मदतीने ''आनंदा''च्या गावाला पोचणारा रस्ता नेहमीच बाजारपेठेतून जाईल अशी आखणी केली; आनंदाच्या गावाला पोचण्यासाठी दुसरा रस्ताच नाही ठेवला.

बाजारपेठेचा रस्ता होता मायावी;

चालता चालता कोणीतरी अदृश्य शक्ती रस्त्यावरून जाणाऱ्यांना हाताला घेऊन बाजारपेठातील कोणत्या तरी दुकानात घेऊन जात असते .

खरेदी करायचे ठरवले नसतांना लोक अगदी नको असणाऱ्या गोष्टी खरेदी करून दुकानातून बाहेर पडत असतात.

लोक दुकानदारांना विचारत असतात ''का हो, या खरेदीवर ''आनंद'' मिळणार होता ना फ्री?''

दुकानदार हसून म्हणतात ''हो टाकलाय ना पॅकिंगच्या आत.''

पण हवे तेव्हढे लोक मार्केट मध्ये येईनात.

त्याचे कारण पुन्हा मार्केटच होते. मार्केट पुरेसे रोजगार निर्माण करत नव्हते. पुरेसे वेतन देत नव्हते सगळे काही स्वतःच बनवत असल्यामुळे स्वयंरोजगार होत नव्हते. त्यामुळे लोकांकडे वस्तूंच्या खरेदीसाठी हवे तेव्हढे पैसेच नव्हते.

मग मार्केटने बँका, स्मॉल बँका, क्रेडिट कार्ड कंपन्या, मायक्रो फायनान्स, सूक्ष्म वित्त, गोल्ड लोन, बाय नाऊ पे लेटर, विना तारण, विना कारण, डिजिटल लेंडींग कामाला लावल्या; जगभरातून भांडवल वाहत येऊ लागले.

आता तर मार्केटने शासनाला सांगून लाडक्या बहीण, भावांच्या नावाखाली डायरेक्ट कॅश द्यायला लावली आहे.

लोक खरेदी करताहेत बचतीची सवय गटारात फेकून दिली आहे. मिळेल तेथून कर्ज ओरबाडताहेत. मग अनेक महिने/अनेक वर्षे ती कर्जे फेडताहेत. ईएमआयला पैसै नाहीत तर कर्ज फेडण्यासाठी नवीन कर्ज काढत आहेत. कर्ज देणाऱ्या संस्थांकडे एवढे भांडवल वाहत येत आहे. की कर्ज घेणाऱ्यांपेक्षा कर्ज देणाऱ्यांचा उत्साह जास्त आहे. आपल्या हातातल्या पिशवीत त्या पॅकेट्च्या आत दुकानदाराने ''आनंद'' देखील पॅक केलं आहे याच आनंदात लोक आपापल्या घरी पोचताहेत. पॅकिंग उघडताहेत, नवीन वस्तुमालाला हुंगताहेत, चव घेताहेत, स्पर्श करताहेत, त्यांना छान वाटतंय. शेवटी ''आनंद'' आपल्या घरात आलाय याच धुंदीत लोक असतांना ......

विक्रमादित्याच्या खांद्यावरून निसटून जंगलात झाडावर जाऊन लटकणाऱ्या त्या प्रेतासारखा ''आनंद'' लोकांच्या घरातून निसटून परत परत बाजारपेठेतील दुकानात जाऊन लटकत आहे!

त्याचा डाव सफल येत आहेत. कारण आनंदाला शोधत लोक परत परत बाजारात, दुकानांत जात आहेत. अजून वेगवेगळ्या वस्तू विकत घेत आहेत. निसटलेला तो ''आनंद'' मिळवण्यासाठी.

---

लोकसंसद

## स्वपक्षातील राजकीय घराणेशाहीचे काय?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी उत्तर प्रदेशमधल्या वाराणसी येथे विविध विकास प्रकल्पाचं उदघाटन आणि पायाभरणी करताना घराणेशाहीवर नेहमीप्रमाणे जोरदार हल्लाबोल केला.घराणेशाहीमुळे सर्वाधिक नुकसान हे तरुणांचं होत असल्याचं नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.यामुळेच आम्ही असा निश्चित केला आहे की, एक लाख तरुणांना आम्ही राजकारणात आणणार आहोत.ज्यांचा कोणत्याही राजकीय कुटुंबांशी संबंध नसेल असं पंतप्रधानांनी म्हटले आहे. हे योग्यच आहे. परंतु कालच महाराष्ट्र विधानसभेसाठी भाजपची ९९ उमेदवारांची जी यादी प्रसिद्ध झाली यात 'घराणेशाही'चाच पगडा दिसून येत आहे. या यादीत मातब्बर नेत्यांच्या नातेवाईकांना तिकीटे दिली आहेत. काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण, भाजपचे मुंबई अध्यक्ष आशीष शेलार यांचे बंधू विनोद शेलार, रावसाहेब दानवे यांचा मुलगा संतोष दानवे, माजी मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचा नातू संभाजी पाटील निलंगेकर, राज्यसभा खासदार धनंजय महाडिक यांचा भाऊ अमल महाडिक ही काही नावे राजकीय घराणेशाहीच दर्शवितात. पंतप्रधानांना इतर पक्षातील राजकीय घराणेशाहीबाबत जसा आक्षेप असतो तसा भाजपमधील राजकीय घराणेशाहीबाबतही असायला हवा. तरच त्यांच्या ताज्या वक्तव्याला अर्थ असणार आहे.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

---

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**२२ ऑक्टोबर**

**१८७८:-** मराठी साहित्याचे दालन रासायनिक विषयांनी समृध्द करणारे लेखक लक्ष्मण गणेश साठे यांचा जन्म. त्यांच्या साहित्यसंपदेत 'रसायनशास्त्राची मुलतत्वे', 'रसायनशास्त्र प्रवेश', 'राष्ट्रीय शिक्षणाचा ओनामा', 'सृष्टिशक्ती शास्त्र' आदी पुस्तके त्यांच्या नावावर आहे. **१८७९ :-** डॉ. वामन दामोदर गाडगीळ यांचा जन्म. तत्कालिन समाजाच्या समस्यांची जाणीव करुन देणारे लिखाण त्यांनी केले. 'विचित्र समाज', 'चंपी', 'मोठ्या मुलींच्या लग्नाच्या चटकदार कथा' या त्यांच्या कथा तर 'मराठवाड्यातील गद्यविहार' या पुस्तकात त्यांनी २३ लेखकांचे गद्य वेचे संपादित केले. **१८९४:-** संस्कृत संवर्धनासाठी 'आनंदाश्रम' ही संस्था स्थापणारे महादेव चिमणाजी आपटे यांचे निधन. कालिदासाच्या शांकुतलाचे मराठी रुपांतर त्यांनी 'मौजेच्या चार घटिका' असे केले होते. याशिवाय 'अपकृत्य शास्त्र अथवा टॉर्ट किंवा नुकसानाचे परिणाम' हे इंग्रजीवरुन केलेले भाषांतर प्रसिद्ध. **१९२०:-**लेखिका विजया अनंत नरवणे यांचा जन्म. 'पलटणाऱ्या छटा' ही कादंबरी त्यांच्या नावावर आहे. **१९२२:-**साहित्यिक गोविंद शनवारे यांचा जन्म. ह्यांचे विविध नियतकालिकांतून हजाराहून अधिक लेख प्रकाशित होणाऱ्या शनवारे यांची 'कथा काँग्रेसची', 'गाथा स्वातंत्र्याची','रावण वध झाला' मिळून ९ माहितीपर पुस्तके, 'अंगद', 'भारतीय स्वातंत्र्याचा उदयभास्कर', 'द्रौपदी, कुंती, विदूर' मिळून १४ चरित्रग्रंथ तसेच 'राष्ट्रप्रवाह : एक धारा','तुका झालासे कळस' ही वैचारिक पुस्तके मिळून ३३ पुस्तके त्यांची प्रकाशित झाली आहेत. **१९३०:-**लेखक सुधाकर खासगीवाले यांचा जन्म. यांची मेंदी रेखन भाग १,२ मधून मेहंदी काढण्याचे सचित्र तसेच रांगोळी भाग १,२ मधून रांगोळी रेखनासाठी सचित्र आणि स्केचिंग-रेखाचित्रे हे चित्रकलेच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असे पुस्तक त्यांच्या नावावर आहे. **१९३२:-** वृत्तपत्रातून लेखन करणाऱ्या लेखिका इंदुमती माधव अरकडी यांचा जन्म. ह्यांचे 'इतिहास-ना. शास्त्र, प्रशासन' आणि 'घटक नियोजन-एक वरदान' ही शैक्षणिक पुस्तकांसह 'त्रिदल', 'दवबिंदू व इतर गोष्टी','निसर्गराणी', 'पिसारा', 'बहादूर सुद्रया' ह्या संस्कार कथा प्रकाशित झाल्या आहेत. **१९३७:-** कवी रमेश दामोदर शेंबेकर यांचा जन्म. 'मुंबई' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह, '१७ मिनिटे' या काव्यसंग्रहातून 'निसर्ग आणि त्याचबरोबर आयुष्यात येणारे विविध अडचणी व सामाजिक बदल' यावर कवी भाष्य करतो. याशिवाय 'इंद्रायणी काठी', 'लवंगी मिरची', 'पर्वती' मिळून सात काव्यसंग्रह आणि एक कादंबरी प्रकाशित. तसेच आणखी बरीच पुस्तके त्यांची प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. **१९४२:-**कवी हिमांषु वामन कुलकर्णी यांचा जन्म. 'बाभुळवन' हा काव्यसंग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९५२:-** लेखक, कवी किशोर त्र्यंबक पाठक यांचा जन्म. आभियांत्रिक शाखेचे पदवीधर असणाऱ्या पाठकांनी 'पालव', 'निरुपण', 'आभाळाचा अनुस्वार' हे काव्यसंग्रह. 'पाण्यातला दिवा' हे ललित लेखसंग्रह. लहान मुलांसाठी 'रिंग रिंग रिंगण' हा बालकाव्यसंग्रह प्रसिद्ध. **१९५७:-** साहित्यिक अ. र. यार्दी यांचा जन्म. त्यांनी अनुवादित केलेल्या पुस्तकांची यादी 'गौतम बुध्दाची आत्मकथा' (हिंदीतून मराठीत), 'संसार चंदनाचा', 'जिहाद', 'खरं खरं संग्या बाळया', 'अस्तित्व', 'काळाच्या पाऊल खुणा', 'बाळ गांधी, बापू झाले', 'तिसरा कान (आगामी), ही सर्व पुस्तके त्यांनी कन्नडमधून मराठीत लिहिले. 'जी एं ची कथा: परिसर यात्रा','बोन्साय' ही पुस्तके प्रसिद्ध झाली. **२०१५:-** लेखक, सामाजिक चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक सभासद हुसेन जमादार यांचे निधन. हमीद दलवाईंचा सहवास लाभलेल्या हुसेन भाईंनी त्यांचा वारसा पुढे चालवून मुस्लिम समाजातील कालबाह्य चालीरिती, रुढी यांच्या विरोधात आवाज उठवला होता. ह्यांचे 'जिहाद' हे अन्यायाविरुध्द लढा या अर्थाने लिहिलेले पुस्तक म्हणजे त्यांचे आत्मकथन होय.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२२ ऑक्टोबर**

१) श्री. रमाकांत रामचंद्र पाटील चेंढरे, २२-१०-१९३९
२) श्रीम. मनीषा मनोहर घैसास अलिबाग, २२-१०-१९५१
३) श्री. प्रवीण यशवंत पाटील अलिबाग, २२-१०-१९५५
४) श्री. गुरूनाथ नारायण थळे झिराड, अलिबाग, २२-१०-१९५८


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
**बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. दत्ताराम जानू तांडेल. स्मरणार्थ, कोळीवाडा, अलिबाग**


# पालिकेच्या गॅस दाहिन्यांची दुरवस्था

## पारंपरिक अंत्यसंस्कार करण्याकडे कल

**। पालघर । प्रतिनिधी ।**
**पर्यावरणाच्या रक्षणासाठी वसई–विरार महापालिकेने तयार केलेल्या गॅस दाहिन्या बंदच असल्यामुळे नागरिकांनी त्याकडे पाठ फिरवली आहे. पालिकेच्या देखभाली अभावी ५ पैकी २ गॅस दाहिन्या बंद झाल्या आहेत. या गॅस दाहिन्यांचा वापर करण्यासाठी पालिकेने तयार केलेली प्रोत्साहन योजना देखील कागदावरच राहिली आहे. यातच नायगाव येथील स्मशानभूमीची दूरवस्था झाली असल्यामुळे नागरिकांना मोबाईलच्या प्रकाशावर अंत्यविधी करावा लागला असल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे स्थानिक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.**



पारंपरिक स्मशानभूमीत मृतदेहांवर अंत्यसंस्कार केल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होतो शिवाय प्रदूषण होत असते. एका मृतदेहाचे दहन करण्यासाठी साधारण साडेचारशे ते पाचशे किलो लाकडे लागतात. याचा खर्च सुमारे अडीच हजार रुपये एवढा येतो. लाकडांसाठी जंगलात वृक्षतोड होऊन वनसंपदा नष्ट होत असते. मृतदेहाचे दहन केल्याने सतत प्रदूषण होत असते. दहनाच्या वेळी होणारे प्रदूषण रोखण्यासाठी आणि पर्यावरणपूरक अंत्यविधी व्हावी यासाठी राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमाअंतर्गत महापालिकांना गॅस दाहिन्या लावण्याचे निर्देश देण्यात आले होते.

वसई-विरार शहर पाालिकेने साडेतीन कोटी खर्च करून नवघर, पाचूबंदर, विराट नगर, आचोळा आणि समेळपाडा या ५ ठिकाणच्या स्मशानभूमीत गॅस दाहिन्या सुरू केल्या होत्या. मात्र, त्याला थंड प्रतिसाद मिळाला आहे. मात्र, विरारच्या विराट नगर आणि नालासोपारामधील समेळपाडा स्मशानभूमीतील गॅस दाहिन्या बंद पडल्या आहेत. मागील वर्षात आचोळ्यात २२४, नवघरमध्ये ४३ तर पाचूबंदर येथे १०२ मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### पालिकेची योजना कागदावरच

**गॅस दाहिनीऐवजी नागरिक आपल्या कुटुंबियांचे अंत्यसंस्कार पारंपरिक पध्दतीनेच करत आहेत. यामुळे या गॅस दाहिन्या विनावापराच्या पडून आहेत. गॅस दाहिन्यांच्या वापर होत नसल्याने पालिकेला लाकडांचा खर्च करावा लागत आहे. पारंपरिक पध्दतीने अंत्यसंस्कार केल्यामुळे वृक्षतोड होते. हे रोखण्यासाठी पालिकेने जनजागृती करण्याचे ठरवले होते. याचाच भाग म्हणून जे नागरिक आपल्या नातलगांच्या मृतदेहांचे अंत्यसंस्कार गॅस दाहिनीत करतील त्यांना प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान केला जाणार होता. तसेच, त्यांना मालमत्ता करातही ५ टक्के सवलत देण्यात येणार होती. मात्र, या योजना कागदावरच राहिल्या आहेत.**

### मोबाईलच्या उजेडात अंत्यसंस्कार

नायगाव पश्चिम कोळीवाडा परिसरात अंत्यसंस्कारासाठी बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीची दुरवस्था झाली आहे. विशेषत: विजेअभावी ग्रामस्थांना रात्री मोबाईल टॉर्चच्या उजेडात अंत्यसंस्कार करावे लागत आहेत. या स्मशानभूमीत विजेची सोय नसल्याने रात्रीच्या वेळी मृतदेहावर अंत्यसंस्कार करणे अवघड झाले आहेत. नुकतेच नायगाव कोळीवाडा भागातील एक मृतदेह अंत्यसंस्कारासाठी या स्मशानभूमीत आणण्यात आला होता. मात्र विजेअभावी मोबाईल टॉर्च आणि दुचाकीच्या प्रकाशात अंत्यसंस्कार करण्यात आले होते.

# बनावट मद्य कारखान्यात छापेमारी

**। पालघर । प्रतिनिधी ।**
मीरा-भाईंदर महानगरपालिकेला एमएमआरडीएकडील रेंटल हाऊसिंग योजना अंतर्गत प्राप्त इमारती या महापालिकेला देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. यात महापालिकेचे लाभार्थी राहत असतात. परंतु, यातच मुंबई-अहमदाबाद महामार्गावर असलेल्या लोढा एमएमआरडीए इमारतीत तळमजल्यावर असलेल्या दुकानात बनावट विदेशी मद्य बनविण्याचा कारखाना सापडला आहे. या प्रकरणी पोलिसांनी मद्य बनवण्याचे साहित्य आणि मशीन असे जप्त करत गुन्हा दाखल केला आहे.



मुंबईच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाला भरारी पथकांना देशी, विदेशी व गावठी हातभट्ट्यांवर विशेष मोहीम राबवून कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठांनी दिले आहेत. त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणूक २०२४ आदर्श आचारसंहिता कालावधीत माहिम सायन लिंक रोड, मुंबई या ठिकाणी विदेशी मद्याच्या बाटल्या घेऊन एक व्यक्ती येणार असल्याची माहिती गुप्त बातमीदारामार्फत मिळाली होती. १७ ऑक्टोबर रोजी पाळत ठेवून मोहम्मद नौशाद नसरूद्दीन आलम या आरोपीच्या ताब्यातून ५ बाटल्या (१००० मि.ली.) बनावट विदेशी मद्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या.

या आरोपीने दिलेल्या माहितीच्या आधारे मीरारोड पूर्वेच्या काशीमिरा भागातील महापालिकेच्या लोढा एमएमआरडीए बिल्डींगच्या तळमजल्यावर छापा घालून बनावटरित्या बनविण्यात आलेल्या विदेशी मद्याच्या दोन बाटल्या, भारतीय बनावटीचे विदेशी मद्याच्या ३ बाटल्या तसेच बनावटरित्या विदेशी मद्याच्या बाटल्या तयार करण्यासाठी आवश्यक सामग्री रिकाम्या बाटल्या, झाकणे, लेबल व इतर साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# चिमुकल्याची चार तासात सुटका

**। पालघर । प्रतिनिधी ।**
वसईतून अपहरण झालेल्या चिमुकल्याची वालीव पोलिसांनी अवघ्या ४ तासात तपास करून सुखरूप सुटका केली आहे. प्रेमसंबंधात चिमुकल्याच्या पालकांचा अडथळा येत असल्याने त्यांना धडा शिकविण्यासाठी एका तरूणीने हे अपहरण केले होते. ही तरुणी टीव्ही मालिकेत अभिनेत्री म्हणून काम करते. वसई पूर्वेच्या गावराई पाडा येथे दिनेश हा पत्नी आणि ३ मुलांसह रहातो. ३ वर्षांचा मुलगा प्रिन्स शाळेत गेला होता. त्यावेळी एक तरुणी शाळेत आली. प्रिन्सला औषध द्यायचे आहे आणि त्याला आईने घरी बोलावले असल्याची थाप तिने मारली. तरुणी प्रिन्सला शाळेतून घेऊन फरार झाली. काही वेळेतच हा प्रकार कुटुंबियांच्या लक्षात आला. याप्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# सांताक्रूझ येथे मांत्रिकांकडून तरुणीची फसवणूक

**। पालघर । प्रतिनिधी ।**
मुंबई सांताक्रूझ येथे राहणाऱ्या एका २० वर्षीय तरुणीला १ लाख ३९ हजार रुपयांचा गंडा घातल्या प्रकरणी तीन मांत्रिकांच्या विरोधात नयानगर पोलीस ठाण्यात १४ ऑक्टोबर रोजी जादूटोणा कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




सप्टेंबरमध्ये मांत्रिक मुस्ताक शाह याने दिलेली जाहिरात पाहून त्याच्याशी संपर्क साधला होता. या जाहिरातीत आर्थिक परिस्थीती सुधारण्यासाठी सक्षम असलेला आध्यात्मिक उपाय केला जाईल, असे म्हटले होते. तरुणीच्या घरची आर्थिक परिस्थिती खराब असल्याने तिने या मांत्रिकावर विश्वास ठेवला. मांत्रिकाने एक पूजा घालावी लागेल, पूजेदरम्यान वेगवेगळ्या शक्ती बोलवाव्या लागणार असून त्यासाठी तुम्हाला मिठाई, फळ फुले, कपडे किंवा कोंबडा या प्राण्याचा बळी द्यावा लागणार, असे सांगितले. त्याला होकार दिल्याने शाह याने पूजेकरिता ६४ हजार घेऊन येण्यास सांगितले. यानंतर २१ सप्टेंबर रोजी ३२ हजार रोख रक्कम आणि ३२ हजार रियाझ चौधरी या इसमाकडे पाठविण्यास सांगितले.

नंतर २२ सप्टेंबर रोजी पूजा संपन्न केली आहे. परंतु, तुमच्या घरावर कोणीतरी काहीतरी केलेले आहे, यासाटी ७५ हजार रुपये लागणार आहेत. घाबरून जात तरूणीने आई वडिलांकडून वैयक्तिक काम आहे असे सांगून ७५ हजार रुपये घेतले. २९ सप्टेंबर रोजी फोन करून सांगितले की, सर्व पूजा संपन्न झाल्या आहेत. सायंकाळी पुन्हा सांगितले की, काल घातलेल्या पूजेत विघ्न आले आहे. यामुळे यापूर्वी दोन म्हशींचा बळी दिला आहे. आणखी एका म्हशीचा बळी द्यावा लागेल. यानंतर तरूणीला आपली फसवणूक झाल्याचे समजले. यानंतर नया नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बांबूच्या बंध विक्रीतून रोजगार

## आदिवासी कुटुंबियांचे उपजिविकेचे साधन



**। पालघर । प्रतिनिधी ।**
शेतकऱ्यांसाठी भाताचे भारे बांधण्यासाठी लागणारे बंध विक्रीतून अनेक आदिवासी कुटुंबियांना दोन महिन्यांसाठी चांगला रोजगार उपलब्ध झाला आहे. जिल्ह्यातील चारशेहून अधिक कुटुंबांचे उपजिविकेचे हे एक साधन बनले आहे.

गेले दोन वर्षे भात कापणी हंगामातच सर्वत्र करोनाचे सावट पसरल्याने येथील आदिवासींना बंध विक्रीचा व्यवसाय करता आलेला नव्हता. तर, गत वर्षी परतीच्या पावसाने मोठ्या प्रमाणावर भाताचे नुकसान केल्याने अनेक शेतकऱ्यांनी बंधचा वापर केला नव्हता. या वर्षी मात्र भात पिकाचे चांगले उत्पन्न आल्याने भारे बांधण्यासाठी मोठ्या संख्येने बंधांची मागणी वाढली आहे. बहुतांश शेतकरी ५०० ते १ हजार बंध खरेदी करताना शेतकरी दिसत आहेत. यामुळे वाडा, विक्रमगड तालुक्यातील आदिवासींना चांगला रोजगार उपलब्ध झाला आहे.

> सप्टेंबर व ऑक्टोबर या दोन महिन्या शेतकरी भात कापणी करत असतो. कापलेले भात बांधण्यासाठी बांबू पासून बनवलेले बंधाचा मोठ्या प्रमाणावर वापर करत असतात. यामुळे या दोन महिन्यात आम्हाला रोजगार मिळतो. तसेच, या व्यवसायातून मिळणाऱ्या पैशातून आमची चूल पेटत असते.
> – महादू भुजाडे, बंध विक्रेता, वाडा

### बंध बनविण्याची पद्धत

दोन ते तीन दिवसांपूर्वीच तोडलेल्या ओल्या बांबूचे ५ ते ६ फूट लांबीच्या अंतरावर तुकडे केले जातात. हे तुकडे दगडावर ठेवून ३ ते ४ दिवस सुकविले जातात आणि शंभर बंधांचा गठ्ठा करुन प्रती शेकडा दोनशे ते तीनशे रुपयांपर्यंत बाजारपेठेत विकायला आणले जातात.

### महिलांच्या हाताला काम

वाडा तालुक्यातील परळी, ओगदा, उज्नेनी, आखाडा या भागातील शेकडो आदिवासी महिला व पुरुष बंध विक्रीचा दरवर्षी सप्टेंबर, ऑक्टोबर या दोन महिन्यांत हा व्यवसाय करतात. या व्यवसायाच्या माध्यमातून येथील अनेकांना चांगला रोजगार मिळत असतो. विशेषतः महिलांच्या हाताला काम मिळाल्याने महिलांकडून अधिक मेहनत केली जात असल्याचे चित्र दिसत आहे.

# अवकाळी पावसामुळे भातशेती धोक्यात

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
संगमेश्वर तालुक्यात अवकाळी पावसामुळे भात शेतीला मोठा फटका बसला आहे. मागील तीन महिन्यांत २५१ शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याची नोंद कृषी विभागाकडे करण्यात आली आहे.

तालुक्यात ६ हजार २५० हेक्टर भातशेतीची लागवड क्षेत्र असून, शेतकरी पारंपरिक तसेच आधुनिक पद्धतीने भातशेती करत आहे. मात्र, यावर्षी अवकाळी पावसाचा मोठा फटका शेतीला बसत असून, अवकाळी पावसामुळे पिकलेली भातशेती आडवी झाली आहे. जंगली प्राण्यांचा होणारा त्रास आणि अवकाळी पाऊस यामुळे भातशेतीच्या लागवडीचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी होत चालले आहे.



यातच शेतीसाठी मनुष्यबळही मिळत नाही, तर आधुनिक यंत्रसामुग्री घेणे परवडत नाही. यामुळे जिल्ह्यात शेतीचे क्षेत्र घटत आहे.

यावर्षी ऑक्टोबर महिन्यात सुरुवातीपासूनच पावसाने हजेरी लावल्याने शेतीचे नुकसान होत आहे. दिवसा कधीही पाऊस कोसळत असल्याने भातशेती तयार झाली असतानाच कापणी करायची कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

# विंधन विहिरींमुळे ७५ लाख वाया

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
उन्हाळ्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी२६८ विंधन विहिरींची खोदाई करण्यात आली होती. यावर २ कोटी ६१ लाख ९० हजार रुपये खर्च केले गेले. यापैकी ११० विहिरी कोरड्या आहेत. यामुळे प्रस्तावित खर्चापैकी पाऊण कोटी वाया गेले आहेत.

जिल्ह्यातील बहुतांश भाग कातळयुक्त आहे. सरासरी साडेतीन हजार पाऊस पडूनही मोठ्या प्रमाणात पाणी नदीनाल्यातून वाहून जाते. यामुळे दरवर्षी जिल्ह्यात उन्हाळ्यामध्ये ग्रामीण भागातील ग्रामस्थांना पाण्यासाठी पायपीट करावी लागते. सुमारे ३०० ते ४०० वाड्यांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. दरवर्षी संभाव्य पाणीटंचाई आराखडा तयार करून पाणीटंचाईला तोंड देण्यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना करण्यात येतात. गतवर्षी जिल्ह्यातील १५२ गावांतील २६८ वाड्यांमध्ये प्रत्येकी एक अशा २६८ विंधन विहिरींची खोदाई प्रस्तावित होती. विहिरींच्या खोदाईसाठी मनुष्यबळ तसेच खोदाईचा खर्चही जास्त होतो. हे टाळण्यासाठी विंधन विहिरींची खोदाई करण्यात येते. विहिरींपेक्षा विंधन विहिरींवर खर्च कमी येत असल्याने अगदी कमी जागेतही त्यांची खोदाई करता येते.

## चिपळूणमधील तरूणाची फसवणूक

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
मोबाईलमधील इन्स्टाग्राम अकाऊंटवर लिंक पाठवून चिपळूण येथील तरुणाची सुमारे ४ लाख रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत येथील पोलिस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हातभट्टी दारू अड्ड्यावर छापा

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
वालोपे गणेशवाडी येथील वाशिष्ठी नदी किनारी पोलिसांनी गावठी हातभट्टी दारू अड्ड्यावर छापा टाकून सुमारे लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई शुक्रवारी (दि.१८) रात्री करण्यात आली होती. याप्रकरणी येथील पोलीस ठाण्यात एकविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईने चिपळूणमध्ये गावठी हातभट्टी सुरू असल्याचे उघड झाले आहे.

पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस निरीक्षक फुलचंद मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने वालोपे गणेशवाडी येथील वाशिष्ठी नदीकिनारी झाडी झुडपामध्ये छापा टाकला असता या ठिकाणी एकजण गावठी दारू गाळत असताना आढळून आला. तसेच, यावेळी दारू उपयोगी साहित्य गुळ, नवसागर मिश्रित कुजके रसायन मिळून आले. सुमारे १ लाख ९ हजार ९०० रुपयांचा हा मुद्देमाल आढळून आला. याप्रकरणी पेढे-परशुराम येथील मंगेश मधुकर दिवेकर (२७) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दारूचे साहित्य बाळगणाऱ्यांना अटक

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
मिरजोळे पाटीलवाडी आणि मुरुगवाडा किरवाडी या ठिकाणी गावठी दारू आणि दारुचे साहित्य आपल्या ताब्यात बाळगणाऱ्या दोघांविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्याकडून एकूण १ लाख ८२ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई शनिवारी (दि.१९) करण्यात आली.

## बहुसंख्य शेतकऱ्यांना मिळाले मार्गदर्शन

# आंबा उत्पादन कार्यशाळा संपन्न

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
**आईटीसी रत्नागिरी ऑरगॅनिक फार्मर ग्रुपच्यावतीने संगमेश्वर तालुक्यातील ताम्हाने विद्यामंदिर येथील सभागृहात शाश्वत आंबा उत्पादन कार्यशाळा नुकतीच घेण्यात आली. या कार्यशाळेला ताम्हाने पंचक्रोशीतील बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.**



कार्यशाळेच्या सुरुवातीला ही कंपनी कोणकोणत्या विषयावर काम करते याची माहिती देण्यात आली. तसेच, प्रथम शेतीमधील अडचणी व नवीन तंत्रज्ञान याचा अभ्यास केला पाहिजे, असा सल्ला कंपनीचे बिझनेस मॅनेजर शैलेंद्र जाधव यांनी यावेळी शेतकऱ्यांना दिला. या कार्यशाळेला आंध्रप्रदेशवरून आलेल्या ऑरगॅनिक प्रोग्राम मॅनेजर चैतन्या भवानी यांनी विविध राज्यातील शेतीविषयक आपले अनुभव सांगत कोकणातील शेतकऱ्यांनी कशा पद्धतीने शेतीत काम केले पाहिजे हे सांगितले. तर, पुढील पिढीने करिअर म्हणून शेतीकडे पाहिले पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.

कोकण कृषी विद्यापीठ सेंद्रिय शेती मार्गदर्शक डॉ. संदीप कांबळे यांनी विषमुक्त आंबा शेतीसाठी सर्वोत्तम पद्धत यावर उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले, सेंद्रिय पद्धतीने शेती वा लागवड करताना प्रथम त्याची लागवडीची पद्धत समजून घेतली पाहिजे.

# पालघरमध्ये वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर

**। पालघर । प्रतिनिधी ।**
भौगोलिक दृष्ट्या तालुक्याचे मुख्यालय मोखाडा हे ठिकाण उंच टेकडीवर असून दोन्ही बाजूने तीव्र उतार आहे. पूर्वीच्या ग्रामपंचायत काळातील लोकवस्ती आणि बाजारपेठेतील प्रमुख रस्त्यांवरील दुकाने आणि शासकीय कार्यालयाच्या आवारात लावलेली वाहने यांची वर्दळ कमी होती.

परंतु, आता लोकसंख्या वाढीसोबतच प्रत्येक घरात दोनचाकी व चारचाकी वाहनांची संख्या वाढत असून तालुक्याला कामानिमित्त येणारा नागरिक हा आपले वाहन घेऊनच मोखाड्यात येतो आणि रस्त्याच्या कडेला जिथे मोकळी जागा दिसेल तिथे पार्किंग करतो. यावेळी या रस्त्यांवरुन दोन चारचाकी वाहने समोरासमोर आल्यानंतर वाहनचालकांना मात्र एकमेकांना बाजू देताना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. यामुळे मोखाड्यातील वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस जटिल होत आहे.



पुर्वीची ग्रामपंचायत आणि आताच्या नगरपंचायतीच्या मोखाडा शहराच्या बाजारपेठेच्या रचनेत फार काही विकासात्मक बदल झालेला नाही. तालुक्याची महत्त्वाची कार्यालये शहरातील प्रमुख बाजारपेठेत आहेत. यामुळे शासकीय कार्यालयात कामानिमित्त येणारा ग्रामीण भागातील नागरिक हा मोखाड्यात आल्यानंतर आपली वाहने रस्त्याच्या कडेला जिथे मोकळी जागा दिसेल तिथे पार्किंग करतात. यावेळी दुकानदार आणि वाहनचालक यांच्यात अनेकदा भांडणे झाली आहेत.

मुळात मोखाडा शहरातील बाजारपेठेमधील रस्ता हा फार काही रुंद नाही आणि एक अर्धा मिटरचे फुटपाथ सोडले तर रस्त्याच्या कडेला इतर मोकळी जागा सुद्धा नाही. उलट काही व्यावसायिकांनी आपल्या दुकानाचे सामान फुटपाथवर लावलेले असते. यामुळे एकाच वेळी दोन चार चाकी वाहने समोरासमोर आल्यानंतर वाहनचालकांना मात्र वाहन कोंडीला सामोरे जावे लागते.

# मैला उचलण्याची प्रथा कायम

## जागतिक पर्यटनस्थळावरील प्रथेबाबत पर्यटकांकडून आश्चर्य

**। माथेरान । वार्ताहर ।**

**जग एकविसाव्या शतकात जात असताना माथेरानमध्ये ब्रिटिश काळापासून पूर्वापार चालत आलेली मैला उचलण्याची प्रथा आजही कायम असल्याने पर्यटकांमधून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.**



पूर्वी पाच दशकांपूर्वी माथेरान या पर्यटनस्थळी उघडी डब्यांची शौचालय अस्तित्वात होती. त्यावेळी नगरपरिषदेच्या सफाई कामगारांमार्फत डब्ब्यात साठलेला मैला मनुष्यबळाचा वापर करून नेत असत. कालांतराने शौचालयाला सेफ्टी टँक बांधण्यात आल्यामुळे हा सर्व मैला या टँकमध्ये साठला जायचा त्यानंतर हे सांडपाणी कड्यात ड्रेनेज लाईनद्वारे सोडले जात होते. तर रस्त्यावर पडलेली घोड्यांची विष्ठा (मैला) आजही नगरपरिषदेच्या कामगारांमार्फत उचलण्यात येत आहे. हा सर्व मैला सफाई कामगार डब्ब्यात भरून अडगळीच्या ठिकाणी अथवा डंपिंग ग्राऊंडवर जमा करत आहेत. ही दुर्गंधीयुक्त कामे करताना कामगारांना गंभीर आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या मैल्यामुळे श्वसनाचे आजार, दमा, हातपाय दुखणे तसेच अन्य आजार बळावण्याची दाट शक्यता आहे.

पूर्वी इथली लाल तांबडी माती एखाद्या सौभाग्याप्रमाणे माथेरानच्या मस्तकावर शोभून दिसत होती.परंतु पर्यटकांना वाहून नेणाऱ्या घोड्यांची संख्या जवळपास पाचशेच्या आसपास असून मालवाहू घोड्यांची संख्या सुध्दा त्याहीपेक्षा अधिक आहे. त्यामुळे या सर्व घोड्यांच्या विष्ठेने हीच तांबडी माती पिवळसर होऊन एकप्रकारे या पर्यटन स्थळाला वैराग्याचे रूप प्राप्त झाले आहे. काही वर्षांपूर्वी इथे क्ले पेव्हर ब्लॉकचे रस्ते बनविण्यात आल्याने रस्त्याच्या दुतर्फा सगळीकडे पिवळसर माती दिसून येत आहे. टपाल पेटीपासून पुढे दस्तुरी नाक्यापर्यंत पूर्णपणे रस्त्यांची साफसफाई नियमितपणे केली जात नाही. त्यामुळे ही घाण मिश्रित माती रस्त्याच्या दुतर्फा साठलेली असते. नगरपरिषदेने सफाई कामगारांमार्फत नियमितपणे ही स्वच्छता करून घेतल्यास सर्वांचे आरोग्य सुरक्षित राहण्यास मदत होणार आहे. प्रशासकीय राजवटीत पुढाकाराची आवश्यकता असल्याचे बोलले जात आहे. नगरपरिषदेच्या ताब्यातील मागील वर्षीच्या सात ई रिक्षा धूळ खात पडून आहेत. सनियंत्रण समिती कडे पाठपुरावा करून यातील काही रिक्षा मैला वाहून नेण्यासाठी उपयोगात आणल्यास सफाई कामगारांचे श्रम काहीअंशी वाचण्यासाठी मदत होईल. त्यासाठी या प्रश्नी नगरपरिषदेची मानसिकता असणे अत्यंत गरजेचे आहे.

> **“ महाबळेश्वरच्या धर्तीवर ज्याप्रमाणे घोड्याची पडणारी विष्ठा घोडेवाल्यांनी उचलावी अशी पध्द्त आहे. ती पध्द्त इथेसुद्धा अंमलात आणल्यास खऱ्या अर्थाने स्वच्छता राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात मदत होईल. ”**
> **अनिल नाईकडे, सफाई कामगार**

> **“ दिवाळीच्या अगोदरच पालिका कर्मचारी विशेष पथक नेमून साफसफाई करणार आहेत. ”**
> **- राहुल इंगळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी माथेरान नगरपरिषद**



# श्रमदानातून वनराई बंधारा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील ४२ गावांमध्ये जलसंजीवनी अभियान राबविणारे युनायटेड वे ही संस्था कार्यरत आहे. या संस्थेच्या माध्यमातून जमिनीतील पाण्याची भूजल क्षमता वाढविण्यासाठी वनराई बंधारा बांधण्यात आला. यावेळी अनेक ग्रामस्थांकडून श्रमदान करण्यात आले.

'युनायटेड वे मुंबई' संस्थेचे जल संजीवनी प्रकल्प कर्जत अंतर्गत अंभेरपाडा, पाथरज, खांडस, नांदगाव आणि वारे ग्रामपंचायतीमधील ४२ गावांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. सामाजिक बांधिलकी (सीएसआर) अंतर्गत युनायटेड वे मुंबई आणि अंभेरपाडा येथील जल संजीवनी प्रकल्पातील महिला बचतगट तसेच गावातील तरुणांनी श्रमदान करून वनराई बंधारा बांधला.

त्यामागचा हेतू पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून जमिनीत मुरवणे हा आहे. याचा उपयोग जमिनीतील पाण्याची भूजल पातळी वाढवून ग्रामस्थांना आणि जनावरांना पिण्यासाठी होईल. २० महिला बचत गटातील सदस्य आणि ९ तरुण तसेच जल संजीवनी प्रकल्पातील ४ सदस्य असे एकूण ४६ जणांनी एकत्र येऊन श्रमदान करण्यात आले आहे.

# डहाणू-जव्हार मार्गाची दुरवस्था

## चिखलामुळे वाहनचालकांना मनस्ताप

**। पालघर । वृत्तसंस्था ।**

डहाणू-जव्हार राज्यमार्गावर गेल्या अनेक वर्षांपासून पावसाळ्यात मोठमोठे खड्डे आणि चिखलामुळे वाहनचालकांना येथून प्रवास करणे अवघड जात आहे. यावर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने खड्ड्यांची संख्या वाढली आहे. परिणामी, अपघातांची संख्यादेखील वाढत आहे. त्यामुळे या रस्त्यावरील खड्डे तत्काळ भरावेत, अशी मागणी करत आंदोलनाचा इशारा वाहनचालकांनी दिला आहे. डहाणू येथून नाशिक, मुंबई, ठाणे, गुजरात या भागात मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. डहाणूत असणारी अदानी कंपनी, आशागड येथील युनिव्हर्सल कॅप्सूल कंपनी, डहाणू, वाणगाव येथील भाजी, चिकू, मासळीची मोठी बाजारपेठ यामुळेही येथे वाहतुकीचे प्रमाण वाढले आहे. त्याचप्रमाणे वाढवण येथे नवीन बंदर निर्माण प्रकल्प सुरू असून त्याच्या कामानिमित्त अनेक वाहनांची ये-जा सुरू असते. तसेच, नवीन रेल्वे रुळांची अनेक कामे सुरू असल्याने अवजड वाहनेही ये-जा करत असतात. त्यामुळे या रस्त्याची पुरती चाळण झाली आहे. दरम्यान, रस्त्याच्या दुरवस्थेबाबत डहाणू बांधकाम विभागाकडे अनेकदा तक्रारी करूनसुद्धा रस्त्याची डागडुजी होत नाही. मागे दोन-चार वेळा खड्डे तात्पुरते भरण्यात आले होते, पण पडलेल्या मोठ्या पावसाने पुन्हा खड्डे निर्माण झाले आहेत. यामुळे अपघातांचेही प्रमाण वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे वाहनचालक त्रस्त झाले आहेत. प्रशासनाने त्वरीत ठोस उपाययोजना करण्याचा मागणी वाहनचालकांनी केली आहे. खड्डे भरल्यास आंदोलन करण्यात येणार आहे.

# कृष्णा म्हात्रे यांचे निधन

**। गडब । वार्ताहर ।**

पेण तालुका शांतता कमिटीचे सदस्य एल. के. म्हात्रे यांचे वडील कृष्णा नामदेव म्हात्रे यांचे नुकतेच वयाच्या ८५व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले.



त्याच्या अंतयात्रेला, राजकीय, सामाजिक, धार्मिक, प्रशासकीय क्षेत्रातील मंडळी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पाश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दहावे सोमवारी (दि.२८) उध्दर पाली येथे तर, उत्तरकार्य बुधवारी (दि.३०) राहात्या घरी आहे.



● राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणूकी निमित्त पनवेल शहर पोलीसांकडून पनवेल शहरात लॉन्गमार्च काढण्यात आला. निवडणूका शांततामय वातावरणात होण्याकरीता पोलीस दल सक्षम असल्याचा संदेश याद्वारे देण्यात आला. (छायाचित्र : राजेश डांगळे)

# वाचन प्रेरणा दिन साजरा

**रत्नागिरी :** मडुरा येथील श्रीमती बनुताई पै ग्रंथालय व संस्कार केंद्र येथे नुकताच वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. मराठी भाषा विभागामार्फत मराठी भाषेचा प्रचार व प्रसारासाठी तसेच वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी २०१५ पासून माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने १५ ऑक्टोबरला कार्यक्रम होता.

# जिल्हा परिषदने खोदलेल्या ११० विहिरी कोरड्या

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

उन्हाळ्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जिल्ह्यात २६८ विंधन विहिरींची खोदाई करण्यात आली. त्यावर २ कोटी ६१ लाख ९० हजार रुपये खर्च केले गेले. त्यापैकी ११० विहिरी कोरड्या आहेत. त्यामुळे प्रस्तावित खर्चापैकी सुमारे ७५ लाख रुपये वाया गेले आहेत. जिल्ह्यातील बहुतांश भाग कातळयुक्त आहे. सरासरी साडेतीन हजार मिमी पाऊस पडूनही मोठ्या प्रमाणात पाणी नदीनाल्यातून वाहून जाते. त्यामुळे दरवर्षी जिल्ह्यात उन्हाळ्यामध्ये ग्रामीण भागातील ग्रामस्थांना पाण्यासाठी पायपीट करावी लागते. सुमारे ३०० ते ४०० वाड्यांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. दरवर्षी संभाव्य पाणीटंचाई आराखडा तयार करून पाणीटंचाईला तोंड देण्यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना करण्यात येतात. गतवर्षी जिल्ह्यातील १५२ गावांतील २६८ वाड्यांमध्ये प्रत्येकी एक अशा २६८ विंधन विहिरींची खोदाई प्रस्तावित होती. विहिरींच्या खोदाईसाठी मनुष्यबळ तसेच खोदाईचा खर्चही जास्त होतो. हे टाळण्यासाठी विंधन विहिरींची खोदाई करण्यात येते. विहिरींपेक्षा विंधन विहिरींवर खर्च कमी येत असल्याने अगदी कमी जागेतही त्यांची खोदाई करता येते. त्यामुळे आता जिल्ह्यात विहिरींऐवजी विंधन विहिरींची खोदाई करण्यात येते. त्यालाही पाणी लागत नाही.

# विधानसभेत मच्छिमारांची भूमिका निर्णायक- संतोष पाटील

**। अलिबाग । वार्ताहर ।**

मुंबईसह कोकण किनारपट्टीवरील २१ विधानसभा मतदार संघात मच्छिमार सेनेची भूमिका अत्यंत निर्णायक ठरणार असल्याचे ठाम प्रतिपादन महाराष्ट्र मच्छिमार सेनेचे मुख्य संघटक संतोष हरिभाऊ पाटील, मंगेश पद्माकर कोळी यांनी केले आहे.

प्राचीन काळापासून कोकण किनारपट्टीवर आदिवासी कोळी जमातीचे वास्तव्य आहे. मुंबई, पालघरसह रायगड जिल्ह्यात पनवेल, उरण, अलिबाग, श्रीवर्धन या विधानसभा मतदारसंघात तर कोळी जमातीचे लहान मोठे अनेक कोळीवाडे आहेत. ज्यांतील मतदार संख्या अत्यंत निर्णायक स्वरूपाची आहे. मुंबई शहर आणि उपनगरांतील ३६ विधानसभा मतदार संघातून निम्म्या मतदार संघात परप्रांतीय निवडून येतात. रायगड, रत्नागिरी, जिल्हयांत या परिस्थीतीची नांदी ऐकू येवू लागली आहे. कोकणात त्याच्याच भूमित विस्थापीत होईल, असा गंभीर इशारा महाराष्ट्र मच्छिमार सेनेच्या कार्यकारीणी बैठकीत बोलताना संतोष पाटील यांनी दिला आहे. कोकण किनारपट्टीवरील मुंबई शहरासह ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यांतील अलिबाग, उरण, पनवेल, श्रीवर्धन व रत्नागिरी या विधानसभा मतदार संघात आमची मतदार संख्या लक्षणीय आहे. यापैकी काही विधानसभा मतदार संघातून कोळी जमातीचे उमेदवार द्यावेत, अशी मागणी महाराष्ट्र मच्छिमार सेनेच्या तर्फे महाराष्ट्रातील विद्यमान राजकीय पक्षांना केली आहे.

कोळी समाजाला प्रतिनिधीत्व न दिल्यास महाराष्ट्र मच्छिमार सेना स्वतः आपले उमेदवार विधानसभा निवडणूकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे मुख्य संघटक मंगेश पद्माकर कोळी यांनी स्पष्ट केले आहे.



# पादचारी पूलाचे काम प्रगतीपथावर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ रेल्वे स्थानकात विकासकामे मध्य रेल्वेकडून सुरु आहेत. नेरळ स्थानकातील फलाट १ वर आणखी एका पादचारी पूलाची निर्मिती मध्य रेल्वेकडून सुरु आहे. या नवीन पादचारी पूलाचे काम अंतिम टप्प्यात असून काही दिवसांनी या पूलाचे काम पूर्ण होणार आहे. काम पूर्ण झाल्यावर हा पादचारी पूल वाहतुकीस खुला होण्याची शक्यता आहे.

मध्य रेल्वेवरील मुख्य लाईनवरील नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकात दोन पादचारी पूल आहेत. परंतु, मुंबई भागातून येणाऱ्या प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी नेरळ स्थानकात फलाट १ वर आणखी एक पादचारी पूल बांधला जात आहे.

या स्थानकात ब्रिटिश काळात ज्या ठिकाणी पादचारी पूल होता त्या ठिकाणी नवीन पादचारी पूल बांधला जात आहे. हा पूल केवळ पायऱ्यांचा आहे. जुना पादचारी पूलाच्या मुख्य भागाला या पायऱ्या जोडल्या जाणार आहेत.


**क्लासिफाईड**

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● नागाव येथे कामासाठी बाई ची आवश्यकता. घरकाम व मुलाला सांभाळणे. पगार- १२,०००/- संपर्क- ७८७५८६६५५५

● फ्लॅट शोधत आहात? नवीन 2BHK प्रशस्त फ्लॅट विकणे आहे. ठिकाण : मोक्याच्या जागी, अलिबाग. अपेक्षित किंमत ८१ लाख, निगोशिएनल संपर्क :- ८२७५११९८८३.

● वरदान फ्युअल स्टेशन येथे कामासाठी मुलगी पाहिजे शिक्षण १५ वी पास व कॉम्प्युटर कोर्स (Tally, Excel) व कमीत कमी एक वर्षाचा एक्सपिरिअन्स हवा भेटायला येण्याची वेळ 10 AM To 4PM संपर्क : ७४४७४०४४११, ७४४७४०४४३८

● अलिबाग शहर येथील हॉस्पिटलसाठी मावशी (आया) हवी आहे. संपर्क : ९८२२४०९८४९, ९८५०३४८५०६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# वैश्य समाजातर्फे मुंबईत विघ्नेश मुरकरांचा सत्कार

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

नाटळ गावचे सुपुत्र विघ्नेश मुरकर यांचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्युदो, कराटे, आणि किक बॉक्सिंग क्रीडा प्रकारांमध्ये पंच आणि प्रशिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल वैश्य समाज मुंबई संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. वैश्य समाज कल्याण केंद्र, बोरीवली (पूर्व) येथे आयोजित वार्षिक दसरा संमेलन आणि विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात त्यांचा सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्यात संस्थेचे विश्वस्त विवेक माणगावकर, अध्यक्ष सुरेश लाड यांनी मुरकर यांना प्रशस्तिपत्र, पुष्पगुच्छ आणि १०,००० रुपयांचा धनादेश देऊन गौरविले. यावेळी प्रमुख पाहुणे वैश्यगुरू हळदीपूर मठाचे अध्यक्ष अशोक नर, संस्थेचे कार्यकारी विश्वस्त गुरुनाथ पांगम व अशोक पारकर, सचिव पल्लवी घाग, कार्याध्यक्ष प्रकाश घाग, कार्यकारिणी सदस्य गजानन रेवडेकर उपस्थित होते. मुरकर यांनी मोफत किकबॉक्सिंग प्रशिक्षण उपक्रम राबवत अनेक विद्यार्थी घडवले आहेत.

# उरणमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**। उरण । वार्ताहर ।**

कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयातील 'अ' जीवन अध्ययन, निरंतर शिक्षण विभाग व गोपाल कृष्ण वाचनालय देऊळवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा केला.



कार्यक्रमाचे अध्यक्ष के.ए.शामा हे होते. विद्यार्थ्यांनी योग्य पुस्तकांची निवड करून वाचन केले पाहिजे व आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. जिजा घरत यांनी स्वतःच्या जीवनातील संघर्ष सांगून वाचनामुळे यशस्वी झाल्याचे सांगितले. तर, ग्रंथपाल शाम धारासुरकर यांनी ग्रंथालयाचे प्रकार विद्यार्थ्यांना सांगितले.

# विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी



**। रोहा । वार्ताहर ।**

तालुक्यातील विविध प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी व पोषक आहाराचे वाटप सुतारवाडी दि रोटरी क्लब ऑफ वरळी-मुंबई, रोटरी क्लब ऑफ लालबाग-मुंबई आणि डेमिसल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रोहा तालुक्यातील कांदळे, चिंचवलीतर्फे अतोणे, विठ्ठलवाडी तसेच खरबाचीवाडी वस्ती या रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत करण्यात आले.

यावेळी रोटरी क्लबच्या अध्यक्ष आकांक्षा बेक्टर, योगेश गुप्ता, सचिन सिंधवी, कविता चांदेकर, दीप्ती तसेच डेसिमल फाऊंडेशनच्या ट्रस्टी नीलम जेठमलाणी, डॉ. अभिषेक, डॉ. ध्रुव, जपानचे डॉ. युता, येरळ केंद्राचे केंद्रप्रमुख भागवत भुसारे, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक उपस्थित होते. यावेळी योगेश गुप्ता यांनी सांगितले की, डिजिटल बोर्डमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाची ओळख होणार आहे.

## महामार्गावरील काँक्रीटीकरणाचा फटका

# राष्ट्रीय महामार्गावर दहा किमीपर्यंत वाहनांच्या रांगा

**। पालघर । वृत्तसंस्था ।**

**मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाचे काँक्रीटीकरण करण्याचे काम सध्या सुरू असल्याने महामार्गावर ठिकठिकाणी वाहतूककोंडी पाहायला मिळत आहे. चारोटी टोल नाक्याच्या समोर मुंबईकडे जाणाऱ्या दोन मार्गिकेवर काँक्रीटीकरण करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे महामार्गावर वाहतूककोंडी होऊन दापचरी ते तवा या दहा ते बारा किमी संपूर्ण मार्गावर वाहनांच्या रांगा लागत आहेत.**

दापचरी ते तवा हे अंतर जाण्यासाठी वाहतूककोंडीमुळे वाहनांना दोन ते अडीच तास इतका वेळ लागत आहे. उड्डाणपुलावर वाहतूक कोंडी झाल्याने वाहन चालकांना सेवा रस्त्याचा वापर करत आहेत. त्यामुळे नाशिक डहाणू राज्य मार्गावरही सकाळच्या वेळी मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी झाली. मेंढवन खिंड, चिल्लार फाटा याही ठिकाणी काँक्रीटीकरण सुरू असल्याने त्या ठिकाणी सुद्धा मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. गुजरातकडून मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली



आहे. त्यामुळे अनेक वाहनांना वाहतूककोंडीत अडकून पडावे लागत आहे. तलासरी ते घोडबंदर दरम्यानच्या प्रवासाला साधारणपणे दीड ते पावणेदोन तास वेळ लागत होता. परंतू, काँक्रीटीकरण सुरू झाल्यापासून याच प्रवासाला तीन ते साडेतीन तास वेळ लागत आहे. तलासरी ते घोडबंदर दरम्यान दोन टोल नाके आहेत. या दोन्ही ठिकाणी टोल वसूली केली जाते. महाम ार्गाच्या काँक्रीटीकरण सुरू असल्याने टोल भरूनही वाहनचालकांना वाहतूककोंडीमध्ये अडकून पडावे लागत आहे. तसेच जास्तीचे इंधनही खर्च होते. त्यामुळे जोपर्यंत महामार्गाचे काम पूर्ण होत नाही. तोपर्यंत टोल वसुली बंद करावी अशी मागणी अनेक वाहनचालक करत आहेत.

तलासरी, चारोटी या ठिकाणावरून अनेक नागरिक महामार्गावरून प्रवास करून वसई, विरार, ठाणे, बोरिवली या ठिकाणी दररोज कामानिमित्त प्रवास करतात. परंतु वाहतूककोंडी होत असल्याने महामार्गावरून प्रवास करणे कठीण झाले आहे. महामार्गावर वाहतूक कोंडी होत असल्याने अनेक नागरिकांनी महामार्गावरून प्रवास करणे टाळून रेल्वेने प्रवास करण्यास सुरुवात केली आहे.

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णनः- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका उरण रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उरण येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकतः-

**मौजे :- बेलोंडाखार ता:-उरण, जि:-रायगड**

| सर्व्हे नं. | शेतकऱ्यांचे नांव | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| ८१/२ | मच्छिंद्रनाथ भाऊ पाटील<br>पार्वती परशुराम नावडेकर<br>राम बाळाराम पालकर | ०.१५.१० | १.३९ |

वर नमुद केलेली मिळकत ही वरील कबजेदाराच्या मालकी हक्कांत व कबजे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विघमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणचाही, कोणताही, कसलाही कुळ वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसीत करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. हे सर्वास कळावे.

ठिकाण :- उरण
दिनांक :- २२/१०/२०२४
ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे
मो. ९८२०६२६९००
ऑफिस पत्ता : शॉप नं.९०५-९०८,
शेल्टॉन क्युबीक्स, प्लॉट नं-८७, सेक्टर १५,
सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई ४००६१४.

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णनः- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका उरण रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उरण येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकतः-

**मौजे :- बेलोंडाखार ता:-उरण, जि:-रायगड**

| सर्व्हे नं. | शेतकऱ्यांचे नांव | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| ८१/१० | श्री. धनाजी अनंता मढवी<br>श्री. बाळु अनंता मढवी<br>श्री. महेश अनंता मढवी<br>श्री. अनंता दुकल्या मढवी | ०.०७.१० | ०.८६ |

वर नमुद केलेली मिळकत ही वरील कबजेदाराच्या मालकी हक्कांत व कबजे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विघमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणचाही, कोणताही, कसलाही कुळ वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसीत करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. हे सर्वास कळावे.

ठिकाण :- उरण
दिनांक :- २२/१०/२०२४
**ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे**
मो. ९८२०६२६९००
ऑफिस पत्ता : शॉप नं.९०५-९०८,
शेल्टॉन क्युबीक्स, प्लॉट नं-८७, सेक्टर १५,
सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई ४००६१४.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली वर्णन केलेल्या परिशिष्ठमधील मिळकतीचे सात बारा अभिलेखामधील भोगवटादार रकान्यामध्ये नमुद असलेल्या श्री. शाह मेघजी पालन उर्फ देढीया आणि श्रीमती हिरावती प्रेमजी देढीया यांचेकडून परिशिष्ठात नमुद केलेली शेती मिळकत खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतींमधील मालकी हक्क, ताबा, वहिवाट, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा वर नमुद व्यक्तींनी आमचे अशिलांना दिलेला आहे. परिशिष्ठांमध्ये नमुद मिळकतीचे क्षेत्रामध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्युपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास परिशिष्ठांमध्ये नमुद मिळकतीवरील मालकी हक्क, ताबा निर्वेध आहेत असे समजुन त्या मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

**परिशिष्ठ**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वरसोली, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील**

| भुमापन क्रमांक | उपविभाग क्रमांक | क्षेत्र हेक्टर आर चौ. मिटर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ४४ | ३ | ०-३९-६० | ५-१२ |

अलिबाग
दिनांक : २१/१०/२०२४

सही / -
**ॲड. अनिकेत ना. पाटील**
ऑफीस : श्रृती सारंग बिल्डींग,
ऑफीस नं.३, युनियन बँक ऑफ
इंडिया समोर, अलिबाग - रायगड.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चेंढरे, स.नं.४६/४, ५ व ४७/२ प्लॉट नं.११ या मिळकतीवर बांधकाम करण्यात आलेली सई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील पहिल्या माळ्यावरील ५३५ स्के.फुट (४९.७२ स्के.मी.) या वर्णनाची निवासी सदनिका ही मिळकत संबंधीत मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| ग्रामपंचायत | मिळकत क्र. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ग्रुप ग्रामपंचायत ता.अलिबाग | १. घर मिळकत क्र.९७१ | १. मंगला सुधांशु श्रीधनकर<br>२. सुधांशु श्रीधनकर |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहीवाटीत असून ती विकणेचा त्यांस हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरी वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार अगर खरेदीखत साठेकरार, दान, गहाण, पोटगी, वाटप, मृत्युपत्र, कुळहक्क, दावा, वहिवाट, अगर इतर कोणताही बोजा अगर हक्क असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत कोणाचीही तक्रार, हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध मालकीची व बोजारहीत आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व नंतर येणाऱ्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहाणार नाहीत ही नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक २१/१०/२०२४

**ॲड. सुजित पां. पाटील**
ऑफिस नं. १, शिवराम भास्कर
बिल्डींग, बाजारपेठरोड, केळकर
नाका, अलिबाग
मो.नं.-९८८१४४५३५२

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमीन मालकांचे दरम्यान झालेली आहेत व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला आहे. सदर मिळकतीचे मालकी हक्कांबाबतचा शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणे कामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

| मौजे | स.नं. | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| कोकबन, ता. रोहा | ३६३ | ०-०२-८<br>पो.ख. ०-००-३<br>एकुण ०-३-१ | ०.६१ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांचेकडे कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे. सदर नोटीस प्रसिद्ध करण्यास तसेच सदर व्यवहारास किरण भालचंद्र भगत यांची कोणत्याही प्रकारची हरकत नाही.

सही /-
अलिबाग
दिनांक : २१/१०/२०२४
**ॲड. अनिकेत ना. पाटील**
ऑफीस : श्रृती सारंग बिल्डींग,
ऑफीस नं. ३, युनियन बँक ऑफ
इंडिया समोर, अलिबाग-रायगड.

सही/-
श्री. किरण भालचंद्र भगत
वैद्यआळी, नागाव, ता. अलिबाग.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वाघविरा ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. हरिश्चंद्र रामचंद्र पाटील रा. नवीन वाघविरा पो. कुसुंबळे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे स्नेही श्री.रोहन पद्माकर वाघमारे रा. चिंधण पो. देविचापाडा, ता. पनवेल, जि. रायगड यांना कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बयाणा पावती विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वाघविरा ता.अलिबाग जि.रायगड | ९ | ०-४७-३०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकुण क्षेत्र ०-४८-८० | ७.०७ |

वर नमुद मिळकतीपैकी हरिश्चंद्र रामचंद्र पाटील यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जा वहिवाटीतील अविभक्त हिश्श्याची ०-२५-०० हे. आर. मिळकत.

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :-२२/१०/२०२४
सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर गाळा क्र.३, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे सातघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| सातघर | ४४ | ०-४३-००<br>०-२४-५०<br>०-६७-५०<br>पो.ख.०-११-१०<br>०-७९-४० | रु.९.८१ | १. सुभाष विठ्ठल पाटील,<br>२. जयकांत विठ्ठल पाटील,<br>३. सुमन विठ्ठल पाटील,<br>४. अभय गंगाधर पाटील,<br>५. राजेश गंगाधर पाटील,<br>६. शुभदा मिलींद मोकल,<br>७. प्रिती राजेश परदेशी,<br>८. स्वाती अश्वीन गुजर,<br>९. शंकर हासूराम म्हात्रे,<br>१०. प्रविण हासुराम म्हात्रे<br>११. मत्सगंधा विलास कडवे,<br>१२. अनिता अरविंद पाटील,<br>१३. सुलोचना हासुराम म्हात्रे,<br>१४. विद्या सुरेश पाटील,<br>१५. साधना राजेंद्र पाटील,<br>१६. गिता कैलास म्हात्रे |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष तावेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २२/१०/२०२४
**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँक समोर,
अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड
मो नं. ९४२२३७५११५

दिनांक : १०/१०/२०२४

## ग्रामपंचायत नवेदर नवगांव

**जाहीर प्रगटन**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम १९६०**

ग्रामपंचायत नवेदर नवगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व नागरीकांना कळविण्यांत येते की, ग्रा. पं. कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अर्ज, नोंदणी खरेदीखत प्रत, मृत्युपत्र, अलिबाग येथील मा. नोटरी समोर खरेदीखत, मा. कार्यकारी दंडाधिकारी साहेब अलिबाग यांचे समोर ॲफिडेवीट व मृत्यु दाखल्यावरून, मा. दुय्यम निबंधक अलिबाग दस्त खरेदीखतानुसार खालील रकान्यातील असेसमेंट रजिस्टरवरील मालमत्ता फेरफार करण्याचे ठरले आहे.

| अ.क्र | गाव | घर क्र. | लांबी x रूंदी | मालमत्तेचे वर्णन | सद्यस्थितीत असेसमेंटवरील नाव | फेरफार व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नवेदर नवगांव | ९७० | १६.२ x १०, गावठाण मिळकत ५० x ३३ | कच्चे सिमेंटपत्रे झोपडे | श्री.आनंद नथुराम पांडव | श्री.रोणित महेश वाटकरे, |

वरील सर्व असेसमेंट फेरफार नोंदीबाबत कोणाला आक्षेप/तक्रार असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिद्धझालेल्या तारखेपासून (१४) दिवसांच्या आत ग्रा. पं.कार्यालयात आपल्या मालकी पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी. मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही यांची नोंद घ्यावी

सही/-
**ग्रामसेवक**
**श्री.एस.पी.बळी**
**ग्रामपंचायत नवेदर नवगांव**
**ता.अलिबाग, जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**सौ.प्रियांती आ घातकी**
**ग्रामपंचायत नवेदर नवगांव**
**ता.अलिबाग जि.रायगड**

दिनांक :१८/१०/२०२४

## ग्रामपंचायत नवेदर नवगांव

**जाहीर प्रगटन**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम १९६०**

ग्रामपंचायत नवेदर नवगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व नागरीकांना कळविण्यांत येते की, ग्रा. पं. कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अर्ज, नोंदणी खरेदीखत प्रत, मृत्युपत्र, अलिबाग येथील मा. नोटरी समोर खरेदीखत, मा. कार्यकारी दंडाधिकारी साहेब अलिबाग यांचे समोर ॲफिडेवीट व मृत्यु दाखल्यावरून, मा. दुय्यम निबंधक अलिबाग दस्त खरेदीखतानुसार खालील रकान्यातील असेसमेंट रजिस्टरवरील मालमत्ता फेरफार करण्याचे ठरले आहे.

| अ.क्र. | गाव | घर क्र. | लांबी x रूंदी | मालमत्तेचे वर्णन | सद्यस्थितीत असेसमेंटवरील नाव | फेरफार व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नवेदर नवगांव | ६५५ | ३० x२७, गावठाण मिळकत ५० x३३ | पक्के सिमेंटपत्रे घर | श्री.इक्बाल इस्माईल सोंडे | श्री.अमित शेषनाथ दखणे |

वरील सर्व असेसमेंट फेरफार नोंदीबाबत कोणाला आक्षेप/तक्रार असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून (१४) दिवसांच्या आत ग्रा. पं.कार्यालयात आपल्या मालकी पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी. मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

सही/-
ग्रामसेवक
**श्री. एस.पी.बळी**
**ग्रामपंचायत नवेदर नवगांव**
**ता.अलिबाग जि.रायगड**

सही/-
सरपंच
**सौ. प्रियंती आ.घातकी**
**ग्रामपंचायत नवेदर नवगांव,**
**ता.अलिबाग जि.रायगड**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)**

ज.म. र अर्ज ७८/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. जनार्दन दाजी पाटील
मु. मुळे, पो. थळ, — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुद्ध

ग्रुप ग्रामपंचायत मुळे, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे मुळे, पो. थळ, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांची आई कै. सुमित्रा दाजी पाटील यांचा मृत्यु दि.०१/०६/१९६७ रोजी मौजे मुळे, येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत मुळे येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत मुळे यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यांस यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन दि.२१/११/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२४/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २४/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. धनश्री धनंजय गुरव, रा. मु. गुरवआळी, पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| झिराड (जुना झिराड गट नं. ३२२) | २४४ | ०-४२-९०<br>पो. ख.०-०२-१०<br>०-४५-०० | ११.२० |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारिख : २२/१०/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वनविभाग**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा**
**जि.रायगड दुरध्वनी क्रमांक - ०२१४०-२६९३१७ फॅक्स- २६९०४२**
Email ID -tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात-५/जन्म-मृत्यू/जाहिर नोटीस/२०२४ — दि. २१/१०/२०२४

## जाहिर नोटीस मसुदा

श्री. गोपाळ लक्ष्मण शिगवण — अर्जदार
मु. कुंबेठ पिटसई ता. तळा जि. रायगड

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, — सामनेवाला
ग्रामपंचायत पिटसई
२. गट विकास अधिकारी पंचायत समिती तळा

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार श्री. गोपाळ लक्ष्मण शिगवण यांचा जन्म दि.०१/०१/१९५३ रोजी मौजे कुंबेट पिटसई ता. तळा, जि. रायगड येथे जन्म झाला असून त्यांचे जन्म नोंद सामनेवाल्यांचे कार्यालयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.१३/०२/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचा जन्म दि.०१/०१/१९५३ रोजी झाला असल्याचे घोषीत करुन जन्म दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे अथवा हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार यांचा जन्म नोंदबाबत सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि. २१ ऑक्टोंबर २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री.मंगेश वामन गुरव, २) श्रीमती. रंजना जनार्दन भगत, ३) अनिता किसन म्हात्रे, ४) शैला विलास राणे, ५) सरिता संजय साबळे, ६) अनिकेत सुनिल घरत व ७) स्नेहा अक्षय मगर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| झिराड | ६६ | ०-१०-००<br>पो. ख. ०-०२-००<br>०-१२-०० | ०.१५ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचे वर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २२/१०/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

**ज.म.र अर्ज ३१/२०२४**

**जाहिर नोटीस**

श्रीम. नुतन प्रशांत गिझम
रा. केगांव, बांधीलवाडी, उरण — अर्जदार
ता. उरण, जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत वेश्वी — सामनेवाला
ता. अलिबाग, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे वेश्वी, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार श्रीम. नुतन प्रशांत गिझम जन्म दि. २५/०८/१९८१ रोजी मौजे वेश्वी, येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत वेश्वी येथे केलेली नसल्याने त्यांचा जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत वेश्वी यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे. तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन दि. २१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२४/०५/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २४/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## दक्षिण आफ्रिकेवर केली ३२ धावांनी मात

# न्यूझीलंडचा संघ ठरला विश्वविजेता

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

**महिला टी-२० क्रिकेटमध्ये ८ वर्षांनंतर एका नव्या चॅम्पियनचा जन्म झाला आहे. न्यूझीलंडने पहिल्यांदाच महिला टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद पटकावत गेल्या अनेक वर्षांपासून ऑस्ट्रेलियन महिला संघाची राजवट संपवली आहे. रविवारी २० ऑक्टोबर रोजी दुबई येथे झालेल्या टी-२० विश्वचषक २०२४ च्या फायनल सामन्यात न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा ३२ धावांनी पराभव करत ट्रॉफीवर नाव कोरले.**




या सामन्यात न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना ५ बाद १५८ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिका संघाला निर्धारित २० षटकात ९ बाद १२६ धावाच करता आल्या. त्यामुळे दक्षिण आफ्रिका संघ पुन्हा एकदा 'चोकर्स' ठरला आहे. न्यूझीलंडची ही तिसरी विश्वचषक फायनल होती. आता २० ऑक्टोबर हा दिवस न्यूझीलंड क्रिकेट संघासाठी ऐतिहासिक ठरला आहे. त्यांनी २४ वर्षांनंतर विश्वचषक जिंकला आहे. याआधी न्यूझीलंड संघाने २००० साली महिला एक दिवसीय विश्वचषक जिंकला होता. मात्र, महिला टी-२० विश्वचषकावर पहिल्यांदाच नाव कोरले आहे. दक्षिण आफ्रिकेच्या क्रिकेटसाठी हा निराशाजनक क्षण आहे. या सामन्यातील पराभवानंतर त्यांचा संघ खूपच निराश दिसत होता. दक्षिण आफ्रिकेचा महिला संघ सलग दुसरा टी-२० विश्वचषक फायनल खेळत होता.

यासोबतच त्यांचा संघ दुसऱ्या अंतिम फेरीतही पराभूत झाला. गेल्या फायनलमध्ये त्यांचा ऑस्ट्रेलियन महिला संघाकडून पराभव झाला होता. तर यावेळी त्यांना न्यूझीलंडच्या महिला संघाकडून पराभव पत्करावा लागला आहे. दरम्यान, पुरुषांच्या टी-२० विश्वचषकाचा अंतिम सामनाही जून २०२४ मध्ये खेळवण्यात आला होता. जिथे त्यांच्या पुरुष संघाचाही भारतीय संघाने अंतिम फेरीत ७ धावांनी पराभव केला होता. एकंदरीत, दक्षिण आफ्रिकेने गेल्या एका वर्षात तीन टी-२० विश्वचषक फायनल गमावल्या आहेत. दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यातील महिला टी-२० विश्वचषक २०२४ च्या विजेतेपदाचा सामना दुबईतील दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियवर खेळला गेला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय आफ्रिकेसाठी मोठी चूक ठरला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या न्यूझीलंडने २० षटकांत १५८/५ धावा केल्या. अमेलिया केरने न्यूझीलंडसाठी सर्वात मोठी खेळी खेळली. तिने ३८ चेंडूत ४ चौकारांच्या मदतीने ४३ धावा केल्या. १५९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ न्यूझीलंडच्या गोलंदाजांसमोर सपशेल ढेपाळला. सलामीला आलेल्या कर्णधार लॉरा वोल्वार्ड आणि ताजमीन ब्रिट्स यांनी संघाला चांगली सुरुवात करून दिली. दोघींनी पहिल्या विकेटसाठी ५१ धावा (४१ चेंडू) जोडल्या. ही अप्रतिम भागीदारी सातव्या षटकात संपुष्टात आली, जेव्हा ताजमीन ब्रिट्स १८ चेंडूत १ चौकाराच्या मदतीने १७ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. या पहिल्या विकेटनंतर आफ्रिकन संघ सावरू शकला नाही. कर्णधार लॉरा वोल्वार्ड २७ चेंडूत ५चौकारांच्या मदतीने ३३ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. येथून संघाने सातत्याने विकेट्स गमावल्या. ज्यामुळे त्यांना दुसऱ्या टी-२० विश्वचषकाच्या फायनलमध्ये पराभव पत्करावा लागला. दरम्यान, न्यूझीलंडच्या संघाने दक्षिण आफ्रिका संघाला हरवताच चाहत्यांनी स्टेडीयममध्ये एकच जल्लोष केला. त्यावेळी फटाक्यांची आतषबाजी देखील करण्यात आली.



# मुंबईचा महाराष्ट्रावर दणदणीत विजय

## ■ ९ विकेट्सनी धूळ चारत नोंदवला हंगामातील पहिला विजय

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

सोमवारी मुंबईतील शरद पवार क्रिकेट स्टेडियमवर मुंबईने महाराष्ट्राचा नऊ गडी राखून पराभव केला. यासह मुंबईने रणजी करंडक २०२४-२५ या हंगामातील पहिला विजय नोंदवला. या सामन्यात पृथ्वी शॉ आणि हार्दिक तामोरे यांनी चौथ्या दिवशी सकाळच्या सत्रात महाराष्ट्राने दिलेल्या ७४ धावांचे लक्ष्य सहज पार केले. मुंबईचा विजय सामन्याच्या पहिल्याच दिवशी निश्चित झाला होता.

या सामन्यातील पहिल्या दिवसातील पहिल्या सत्रातच मुंबईने महाराष्ट्राला १२६ धावांत गुंडाळले होते. प्रत्युत्तरात १७ वर्षीय सलामीवीर आयुष म्हात्रेने शानदार शतक झळकावून संघाचा पाया रचला. त्यानंतर श्रेयस अय्यरने आणखी एक शतक झळकावून संघाला ३१५ धावांची भक्कम आघाडी मिळवून दिली. कर्णधार ऋतुराज गायकवाडच्या शानदार शतकामुळे महाराष्ट्राने दुसऱ्या डावात कडवे आव्हान उभे केले. पण, पाहुणा संघ विजय मिळवू शकला नाही. या सामन्यतील दोन्ही डावात महाराष्ट्राने अनुक्रमे १२६ आणि ३८८ धावा केल्या होत्या, तर मुंबईने पहिल्या डावात ४४१ आणि दुसऱ्या डावात ७५ धावा करुन सामना जिंकला.दुससरा दिवस श्रेयस आणि आयुषने गाजवला

या सामन्याचा दुसरा दिवस मुंबईसाठी श्रेयस आणि आयुष म्हात्रे, तर महाराष्ट्रासाठी हितेश वाळुंज आणि कर्णधार ऋतुराज गायकवाड यांनी गाजवला. श्रेयसने प्रथमश्रेणी कारकीर्दीतील १४ वे शतक साकारताना १२ चौकार आणि चार षटकारांच्या साहाय्याने १४२ धावांची चांगली खेळी केली. १७ वर्षीय सलामीवीर आयुष म्हात्रेनेही (२३२ चेंडूंत १७६) अप्रतिम फलंदाजी केली. त्यामुळे मुंबईने पहिल्या डावात ४४१ धावा केल्या होत्या.

त्याआधी, दुसऱ्या दिवशी ३ बाद २२० धावांवरून पुढे खेळताना मुंबईसाठी श्रेयस आणि आयुष यांनी उत्कृष्ट फलंदाजी केली. त्यांनी तिसऱ्या गड्यासाठी २०० धावांची भागीदारी रचली. आयुष द्विशतकी मजल मारणार असे वाटत असतानाच डावखुरा फिरकीपटू हितेश वाळुंजने त्याला माघारी धाडले. आयुषने १७६ धावांची खेळी २२ चौकार आणि ४ षटकारांनी सजवली. यानंतर मात्र वाळुंजच्या प्रभावी माऱ्यापुढे मुंबईने ठरावीक अंतराने गडी गमावले.

# कागिसो रबाडाने केला विश्वविक्रम!

## ■ बांगलादेशविरुद्ध केला खास पराक्रम

**। ढाका । वृत्तसंस्था।**

दक्षिण आफ्रिकेचा धडाकेबाज वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाने कसोटी क्रिकेटमध्ये इतिहास घडवला आहे. सोमवारी (२१ ऑक्टोबर) ढाका येथे बांगलादेशविरुद्धच्या कसोटी सामन्यादरम्यान त्याने मोठी कामगिरी केली. रबाडाने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात विश्वविक्रम केला. त्याने बांगलादेशचा अनुभवी फलंदाज मुशफिकर रहीमला पहिल्या डावात बाद करत पाकिस्तानच्या महान वकार युनूसचा विक्रम मोडीत काढला आहे. कागिसो रबाडाने रहीमच्या रुपाने त्याच्या कसोटी कारकिर्दीतील ३०० वी विकेट घेतली. क्रिकेटच्या सर्वात मोठ्या फॉरमॅटमध्ये ३०० विकेट्स पूर्ण करणारा तो सहावा दक्षिण आफ्रिकेचा गोलंदाज ठरला. तो आता ॲलन डोनाल्ड, शॉन पोलॉक आणि डेल स्टेनसारख्या महान खेळाडूंच्या यादीत सामील झाला. रबाडाने ११ षटकात २६ धावा देत ३ बळी घेतले. दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा हा कसोटी इतिहासातील सर्वात कमी चेंडूत ३०० विकेट्स घेणारा गोलंदाज ठरला. त्याने वकार युनूसचा विक्रम मोडला आहे. वकार युनूसने १२६०२ चेंडूत ३०० कसोटी विकेट्स घेतल्या, तर रबाडाने ११८८७ चेंडू टाकत ३०० विकेट्स पूर्ण केल्या आहेत.




## अभिनव ज्ञानमंदिर हायस्कूलचे यश

**माणगाव :** अभिनव ज्ञानमंदिर उसर खुर्द विदयालयाने रसायनी येथे पार पडलेल्या पावसाळी क्रीडा स्पर्धेत तळा तालुक्याचे नेतृत्व केले. यामध्ये हर्ष बाबुराव तांबे याने ४०० मीटर धावणे स्पर्धेत जिल्हा पातळीवर प्रथम क्रमांक मिळवला, तर ६०० मीटरमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. हर्ष हा आता विभाग पातळीवर रायगड जिल्हयाचे प्रतिनिधीत्व करणार आहे. क्रिडा प्रमुख विनोद लाड, गावित यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. शालेय समिती अध्यक्ष किशोर आल्हाट, सदस्य नटे, विजय सावंत, भालेकर, मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे, संस्थेचे सरचिटणीस निलेश रेवगडे यांनी सर्वांचे अभिनंदन आणि कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# चेतेश्वर पुजाराने मोडला ब्रायन लाराचा मोठा विक्रम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा अनुभवी खेळाडू चेतेश्वर पुजाराने छत्तीसगड विरुध्द खेळताना शतक झळकावत मोठा पराक्रम केला आहे. त्याने ब्रायन लाराचा विक्रम मोडीत काढला आहे. तो सध्या रणजी ट्रॉफी २०२४ मध्ये सौराष्ट्र संघाकडून खेळत आहे. त्याबरोबर पुजाराने शतक झळकावत आपल्या संघाला संकटातून बाहेर काढले आहे. त्याने आपले शतक १९७ चेंडूत पूर्ण केले.



### पुजाराची आंतरराष्ट्रीय कारकीर्द

**चेतेश्वरने २०१० मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध बंगळुरू येथील कसोटीतून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. आतापर्यंत त्याने १०३ कसोटी, ५ एकदिवसीय सामने खेळले आहेत. कसोटीच्या १७६ डावांमध्ये त्याने ४३.६० च्या सरासरीने ७१९५ धावा केल्या आहेत. या कालावधीत त्याने १९ शतके आणि ३५ अर्धशतके केली. त्याची सर्वाच्च धावसंख्या २०६ आहे.**

### पुजाराने प्रथम श्रेणी कारकिर्दीतील झळकावले ६६ वे शतक

**चेतेश्वर पुजाराच्या प्रथम श्रेणी कारकिर्दीतील हे ६६ वे शतक आहे. यासह त्याने दिग्गज फलंदाज ब्रायन लाराला मागे टाकले आहे. लाराने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ६५ शतके झळकावली होती. भारतासाठी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये सचिन तेंडुलकर आणि सुनील गावस्कर यांच्या नावावर हा विक्रम आहे. त्या दोघांनी सर्वाधिक शतके झळकावली आहेत. त्यामध्ये दोन्ही खेळाडूंच्या नावावर तब्बल ८१-८१ शतकांचा सनावेश आहे.**

### प्रथम श्रेणीत सर्वाधिक धावा करणारा चौथा खेळाडू

**छत्तीसगडविरुद्ध शतक झळकावल्यानंतर चेतेश्वर पुजाराने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये २१००० धावा पूर्ण केल्या आहेत. तो प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा चौथा भारतीय फलंदाज आहे. सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविड यांनी भारतासाठी प्रथम श्रेणीत त्याच्यापेक्षा जास्त धावा केल्या आहेत. भारतासाठी प्रथम श्रेणीत सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम गावस्कर यांच्या नावावर आहे. त्यांनी २५८३४ धावा केल्या आहेत.**

## सामन्यात ठोकल्या दोन सेंच्युरी

# जम्मू-काश्मीरच्या अब्दुलची कामगिरी



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतात सध्या रणजी ट्रॉफी २०२४ स्पर्धा सुरू असून दुसऱ्या फेरीत जम्मू-काश्मीर आणि ओडिशा संघात सामना सुरू आहे. हा सामना २२ वर्षीय अब्दुल समदने दोन शतकं करत गाजवला आहे. त्याने यासह एका मोठ्या विक्रमालाही गवसणी घातली आहे. कटकमधील बाराबाती स्टेडियमवर हा सामना होत आहे. पहिल्या डावात समद चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला उतरला. यावेळी त्याने आक्रमक खेळी करताना ११७ चेंडूत १२७ धावांची खेळी केली. या खेळीत त्याने ६ चौकार आणि ९ षटकार मारले. त्याचबरोबर दुसऱ्या डावातही समदने चौथ्या क्रमांकावर खेळताना आक्रमकच फलंदाजी केली. त्याने दुसऱ्या डावात १०८ चेंडूत ५ चौकार आणि ६ षटकारांसह नाबाद १०८ धावांची खेळी केली. त्यामुळे समद एकाच रणजी ट्रॉफी सामन्यात दोन शतके करणारा जम्मू-काश्मीर संघाचा पहिलाच खेळाडू ठरला आहे. याशिवाय त्याने दोन्ही डावात फलंदाजी करताना एकूण १५ षटकार खेचले. त्यामुळे एका प्रथम श्रेणी सामन्यात सर्वाधिक षटकार मारणाऱ्या भारतीय खेळाडूंच्या यादीत तो युसूफ पठाणसह तिसऱ्या क्रमांकावर आला आहे. युसूफने २००९-१० हंगामात वेस्ट झोनकडून साऊथ झोनविरुद्ध खेळताना १५ षटकार मारले होते. या यादीत अव्वल क्रमांकावर तन्मय अग्रवाल आहे, त्याने हैदराबादसाठी २०२३-२४ हंगामात अरुणाचल प्रदेशविरुद्ध खेळताना तब्बल २६ षटकार मारले होते. तसेच दुसऱ्या क्रमांकावर ऋषभ पंत असून त्याने दिल्लीसाठी २०१६-१७ हंगामात झारखंड विरुद्ध २१ षटकार मारले होते. जम्मू-काश्मीरने पहिल्या डावात समदच्या शतकानंतर सर्वबाद २७० धावा केल्या होत्या. समद व्यतिरिक्त कोणालाही मोठी खेळी करता आली नाही. ओडिशाकडून सुमीत शर्माने सर्वाधिक ५ विकेट्स घेतल्या. त्यानंतर ओडिशाकडूनही पहिल्या डावात कर्णधार गोविंदा पोद्दारने नाबाद १३३ धावा केल्या.

ओडिशा सर्वबाद २७२ धावांपर्यंत पोहचला. ओडिशाला २ धावांची आघाडीही मिळाली. दुसरा डाव जम्मू-काश्मीरने समदच्या शतकानंतर ७ बाद २७० धावांवर घोषित केला. अखेरच्या दिवशी ओडिशासमोर विजयासाठी २६९ धावांचे जलक्ष्य आहे.

# पहिल्याच सामन्यात श्रीलंकेचा वेस्ट इंडिजला दणका



## ५ विकेट राखून मिळवला विजय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

श्रीलंका आणि वेस्ट इंडिज यांच्यात तीन सामन्यांची वनडे मालिका सुरु आहे. या मालिकेतील पहिला सामन्यात श्रीलंकेने बाजी मारली. वेस्ट इंडिजने प्रथम फलंदाजी करताना ३८.३ षटकात ४ गडी गमवून १८५ धावा केल्या. डकवर्थ लुईस नियमानुसार श्रीलंकेला २३२ धावांचं आव्हान ३७षटकात गाठायचं होतं. श्रीलंकेने आक्रमक फटकेबाजी करत संघाला विजयाच्या जवळ आणून सोडलं.

### दोन्ही संघांची प्लेइंग ११

**श्रीलंका (प्लेइंग इलेव्हन): निशान मदुष्का, अविष्का फर्नांडो, कुसल मेंडिस (विकेटकीपर), कामिंदू मेंडिस, चरिथ असालंका (कर्णधार), सदीरा समरविक्रमा, जेनिथ लियानागे, वानिंदू हसरंगा, ड्युनिथ वेललागे, जेफ्री वेंडरसे, असिथा फर्नांडो. वेस्ट इंडीज (प्लेइंग इलेव्हन): ब्रँडन किंग, ॲलिक अथनाझे, शाई होप (विकेटकीपर/कर्णधार), कीसी कार्टी, रोस्टन चेस, शेरफेन रदरफोर्ड, रोमॅरियो शेफर्ड, गुडाकेश मोटी, हेडन वॉल्श, जेडेन सील्स, अल्झारी जोसेफ**

श्रीलंकेने ५ गडी गमवून ३१.५ षटकात हे आव्हान गाठलं. नाणेफेकीचा कौल जिंकल्यानंतर वेस्ट इंडिजचा कर्णधार शाई होपने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र वारंवार पावसाच्या व्यत्ययामुळे या सामन्यात खंड पडला.

अविष्का फर्नांडोच्या रुपाने पहिली विकेट दुसऱ्या षटकात अवघ्या ६ धावांवर पडली. त्यानंतर आलेला कुसल मेंडिस काही खास करू शकला नाही. ८ चेंडूत १३ धावा करून बाद झाला. तर सदीरा समरविक्रमचा डाव अवघ्या १८ धावांवर आटोपला. निशान मधुशंका, चरिथ असलंका यांनी चांगली खेळी केली. खेळीमुळे श्रीलंकेचा विजय सोपा होण्यास संघाला मदत झाली.

# दिल्ली कॅपिटल्सचा शिलेदार सोडणार संघाची साथ?

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेच्या लिलावापूर्वी अनेक संघ आपल्या सपोर्ट स्टाफमध्ये बदल करताना दिसत आहेत. यामध्ये दिल्ली कॅपिटल्स संघही आहे. काही दिवसांपूर्वीच दिल्ली आणि मुख्य प्रशिक्षक रिकी पाँटिंग यांच्यातील करार संपुष्टात आला. त्यानंतर दिल्लीने हेमांग बदानी यांना मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी दिली. तसेच वेणुगोपाल राव यांच्याकडे क्रिकेट संचालक म्हणून जबाबदारी देण्यात आली. आता दिल्लीबरोबर ९ वर्षांपूर्वी जोडले गेलेले मुंबईचे प्रवीण आमरे हे देखील संघाची साथ सोडण्याची शक्यता आले. प्रवीण आमरे सध्या दिल्लीचे सहाय्यक प्रशिक्षक आहेत. टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार सुत्राने माहिती दिली की, आमरे यांनी दिल्लीची साथ सोडणे हे परस्पर समजूतीने झाले आहे. संघासाठी नवी पिढी तयार करण्यासाठी त्यांनी घेतलेल्या कष्टाने फ्रँचायझी मालकांना नेहमीच कौतुक राहले आहे. पण त्यांचा आता चार वर्षांचा करार संपला आहे. त्यांना नवी भूमिका मिळू शकते, पण त्या भूमिकेचा थेट दिल्लीशी संबंध असण्याची शक्यता कमी आहे. डोमेस्टिक टॅलेंट स्काऊट म्हणूनही काम पाहात होते.

## बीसीसीआयने केली रियाध आणि जेद्दाह या दोन शहरांची निवड

# सौदी अरेबियात आयपीएल २०२५ साठी मेगा ऑक्शन

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

**इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल २०२५) च्या आगामी हंगामासाठी बीसीसीआयने जोरदार तयारी सुरु केली आहे. पुढील महिन्यात आयपीएल २०२५ साठी मेगा ऑक्शन आयोजित केला जाणार आहे. बिसीसीआयने मेगा ऑक्शन आयोजित करण्यासाठी सर्व संभाव्य पर्यायांचा शोध घेतला आहे.** यामध्ये सौदी अरेबियातील दोन शहरे शॉर्टलिस्ट करण्यात आली आहेत.

मेगा ऑक्शनच्या जागेबाबत आणि तारीखेबद्दल लवकरच अंतिम निर्णय घेतला जाईल. बीसीसीआयने सौदी अरेबियातील रियाध आणि जेद्दाह या दोन शहरांची निवड केली आहे. यापूर्वी ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्ना व्यतिरिक्त सिंगापूर, लंडन आणि दुबईच्या नावांचा विचार केला जात होता. बीसीसीआयने या शहरांबाबत खूप विचार केला, पण आता सौदी अरेबियाची दोन शहरे सर्वात पुढे आहेत. त्यामुळेआयपीएल२०२५ साठीचा लिलाव रियाध किंवा जेद्दाह या शहरात आयोजित केला जाऊ शकतो. सध्या रियाध आघाडीवर असून लवकरच अधिकृत घोषणा केली जाईल.




क्रिकबझच्या माहितीनुसार, बीसीसीआयने आधीच आपले अधिकारी सौदी अरेबियाला पाठवले आहेत. दोन दिवसांचा लिलाव भारतात व्हावा अशी फ्रेंचायझीची इच्छा होती. परंतु पर्याय उपलब्ध नव्हता. आता ते बीसीसीआयने आयपीएल मेगा लिलावासाठी ठिकाण आणि तारीख निश्चित करण्याची वाट पाहत आहे. जेणेकरून ते प्रवासाची व्यवस्था करू शकतील. आयपीएलचा मेगा ऑक्शन २५-२६ नोव्हेंबर रोजी आयोजित केला जाऊ शकतो. यादरम्याने भारत-ऑस्ट्रेलिया पहिली कसोटी (२२-२६ नोव्हेंबर) खेळली जाणार असल्याने अडथळा निर्माण झाला होता. दोन्ही एकाच दिवशी येत असल्याने बीसीसीआयला तारखांबद्दल काही शंका होती. मात्र, मंडळाने यावर तोडगा काढला आहे. वास्तविक, डिस्ने हॉटस्टारकडे भारत-ऑस्ट्रेलिया कसोटी मालिका आणि आयपीएलचे प्रसारण हक्क आहेत. अशा स्थितीत दोन मोठ्या कार्यक्रमांची टक्कर होऊ शकते. गेल्या काही वर्षांत आयपीएल लिलाव हा एक मोठा कार्यक्रम ठरला आहे. लाखो लोक हा कार्यक्रम पाहतात. हे बीसीसीआयला माहीत आहे. या कारणांमुळे आयपीएलचा लिलाव दुपारी होणार असल्याचे सांगितले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)